# ‘आदिवासी समाजाच्या सक्षमिकरणाच्या शासकीय योजनांचा अर्थशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ काळमनूरी तालुका’

## लघु शोध प्रकल्प

*In Economics Subject Under Research Seed Money Fund (RSMF)*

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड


**Principal Investigator**

संशोधक

डॉ. अण्णाजी दयाराम मडावी

(एम. ए., सेट, पीएच. डी.)

सहा. प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख

आदर्श शिक्षण संस्थेचे

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हिंगोली

ता. जि. हिंगोली ४३१५१३.


मार्च - २०२३

# प्रमाण पत्र

प्रमाणित करण्यात येते की, **'आदिवासी समाजाच्या सक्षमीकरणाच्या शासकीय योजनांचा अर्थशास्त्रीय अभ्यास : विषय संदर्भ कळमनुरी तालुका'** हा लघु शोध प्रकल्प ***In Economics Subject Under Research Seed Money Fund (RSMF)*** *अंतर्गत* स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सादर केला असून विद्यापीठ / यू.जी. सी. च्या नियमानुसार मी स्वत: संशोधनपूर्वक लिहिला आहे

प्रस्तुत लघु शोध प्रकल्पातील सर्व मजकूर माझ्या संशोधनपर अभ्यासवर आधारलेलेला आहे. हा शोध प्रकल्प अथवा त्याचा इतर कोणताही भाग इतर कोणत्याही विद्यापीठात या स्वरूपात कोणीही सादर केला नही.

दिनांक : १४ / मार्च /२०२३

ठिकाण : हिंगोली

**Principal Investigator**

संशोधक

डॉ. अण्णाजी दयाराम मडावी

आदर्श महाविद्यालय, हिगोली ४३१५१३

# ऋणनिर्देश

'आदिवासी समाजाच्या सक्षमीकरणाच्या शासकीय योजनांचा अर्थशास्त्रीय अभ्यास: विषय संदर्भ कळमनुरी तालुका' या लघु शोध प्रकल्पाला *In Economics Subject Under Research Seed Money Fund (RSMF) अंतर्गत स्वामी* रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड ने मंजूरी देऊन अर्थसाहाय्य केले त्याबद्दल सर्वप्रथम प्रस्तुत विद्यापीठाचे आभार व्यक्त करतो. मी ज्या संस्थेत कार्यरत आहे त्या आदर्श शिक्षण संस्था, हिंगोली चे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास आघाव यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्यामुळे प्रस्तुत लघु शोध प्रकल्प पूर्ण होऊ शकले याबद्दल त्यांचे ऋण व्यक्त करणे माझे कर्तव्य समजतो.

प्रस्तुत लघु शोध प्रकल्पासाठी येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी वेळोवेळी ज्यांचे मला मार्गदर्श लाभले त्यामध्ये माझे संशोधक मार्गदर्शक प्रो. डॉ. ए. टी. तवार, प्रो. डॉ. विकास सुकाळे, प्रो. डॉ. पांडुरंगपाटील, डॉ. राजाराम पिंपळपल्ले यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. तसेच माझ्या परिवारातील माझी सुविद्य पत्नी सौ. मेघा आणि माझी छोटी कन्या कु. आराध्या यांच्या सहकार्याशिवाय, त्यागाशिवाय हे कार्य पूर्ण करता आले नसते त्यामुळे त्यांचे सदैव ऋणी राहणार.

**Principal Investigator**
संशोधक
डॉ. अण्णाजी दयाराम मडावी
आदर्श महाविद्यालय, हिगोली ४३१५१३.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १ | * | शिर्षक | I |
| २ | * | प्रमाण पत्र | II |
| ३ | * | ऋणनिर्देश | III |
| ४ | * | अनुक्रमणिका | IV |
| ५ | * | तक्ता सूची | V-VI |
| ६ | * | आलेख सूची | VII |
| ७ | प्रकरण पहिले | प्रस्तावना व संशोधन पद्धती | १ - ९ |
| ८ | प्रकरण दुसरे | संशोधन साहित्याचा आढावा | १० - २२ |
| ९ | प्रकरण तिसरे | हिंगोली जिल्ह्याची पार्श्वभूमी | २३ - ३३ |
| १० | प्रकरण चौथे | आदिवासींसाठी असलेल्या शासकीय योजनांचा अभ्यास | ३४ - ५९ |
| ११ | प्रकरण पाचवे | आदिवासी समाजाचे आर्थिक विश्लेषण | ६० - ७७ |
| १२ | प्रकरण सहावे | निष्कर्ष व शिफारशी | ७८ - ८१ |
| १३ | * | संदर्भग्रंथ सूची | ८२ - ८४ |
| १४ | * | मुलाखत अनुसूची | ८५ - ९० |

## तक्ता सूची


| अ. क्र. | तक्ता क्रमांक | शिर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १ | १.१ | नमूना पाहणीसाठी निवडलेल्या गावाची नावे | ७ |
| २ | ३.१ | हिंगोली जिल्ह्याची लोकसंख्या (जनगणनावर्ष-२०११) | २६ |
| ३ | ३.२ | हिंगोली जिल्ह्यातील अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या | २७ |
| ४ | ४.१ | आदिवासी उपयोजना अर्थसंकल्पीय तरतूद ( कोटी रू.) (आर्थिक वर्ष २०२२-२३) | ५१ |
| ५ | ४.२ | आदिवासी उपयोजनेसाठी विशेष केंद्रीय सहाय्य (लाख रु.) (आर्थिक वर्ष २०२२-२३) | ५२ |
| ६ | ४.३ | भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) नुसार केंद्रीय सहाय्य (लाख रु.) (आर्थिक वर्ष २०२२-२३) | ५३ |
| ७ | ४.४ | जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेवारील विविध घटकानुसार खर्च (आर्थिक वर्ष-२०२१-२०२२) | ५६ |
| ८ | ४.५ | जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेवारील सुरवतीपासूनचा खर्च (आर्थिक वर्ष-२०२१-२०२२) | ५७ |
| ९ | ४.६ | जिल्ह्यातील पारधी आवास योजनेवारील खर्च (आर्थिक वर्ष-२०२१-२०२२) | ५८ |
| १० | ५.१ | नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे व्यवसायानुसार केलेले वर्गीकरण | ६3 |
| ११ | ५.२ | नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे शेत जमिनीच्या आकारामानुसार वर्गीकरण | ६४ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | ५.३ | नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे सिंचन साधनानुसार वर्गीकरण | ६५ - ६६ |
| १३ | ५.४ | नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे शेती पूरक व्यवसायानुसार वर्गीकरण | ६७ |
| १४ | ५.५ | नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न गटानुसार वर्गीकरण | ६८ |
| १५ | ५.६ | नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे कर्जाच्या साधनांनुसार वर्गीकरण | ७० |
| १६ | ५.७ | नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे आदिवासी विकास योजनांच्या माहितीनुसार वर्गीकरण | ७२ |
| १७ | ५.८ | नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे आदिवासी विकास योजनांच्या माहितीच्या स्त्रोतानुसार वर्गीकरण | ७३ |
| १८ | ५.९ | नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील लाभार्थी यांचे विकास योजनानुसार वर्गीकरण | ७४ |
| १९ | ५.१० | नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे व्यसन प्रकारानुसार वर्गीकरण | ७६ |

# आलेख सूची


| अ. क्र. | आलेख क्रमांक | शिर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १ | ३.१ | हिंगोली जिल्ह्यातील अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या (जनगणना वर्ष-२०११) | २८ |
| २ | ३.२ | जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण (जनगणना वर्ष २००१ आणि २०११) | २९ |
| ३ | ५.१ | नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न गटानुसार वर्गीकरण | ६९ |
| ४ | ५.२ | नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील लाभार्थी यांचे विकास योजनानुसार वर्गीकरण | ७५ |
| ५ | ५.३ | नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे व्यसन प्रकारानुसार वर्गीकरण | ७७ |

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना व संशोधन पद्धती

## १.१ प्रस्तावना :

आदिवासी म्हणून ओळखले जाणाऱ्या जमातीचे अस्तित्व जगातील बहुतांश देशात आढळून येते. आशिया, आफ्रिका, युरोप अमेरिका या खंडातील देशात आदिवासी जमातीचे अस्तित्व मोठ्या प्रमाणात दिसून येते. जगातील प्रत्येक आदिवासी जमातींना तिचे स्वतंत्र नाव आहे. जसे अमेरिकेतील आदिवासी यांना 'रेड इंडियन्स' या नावाने ओळखले जाते. तसेच अमेरिकेतील 'ॲरिझोना' हे घटक राज्य आदिवासी संस्कृतीचे माहेरघर म्हणून प्रसिद्ध आहे. आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत आफ्रिका खंडानंतर भारताचा दूसरा क्रमांक लागतो[१]. जगातील एकूण आदिवासी लोकसंख्या पैकी २३ टक्के आदिवासी लोक भारतात वास्तव्यास असल्याचे दिसून येते. संयुक्त राष्ट्र संघटनेकडे भारतातील जवळपास ६ कोटी आदिवासींची नोंद करण्यात आले आहे[२]. भारताच्या सर्व भागांमध्ये आदिवासी जमाती वास्तव्यास असल्याचे दिसून येते. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण लोकसंख्येपैकी ८.६ % लोकसंख्या आदिवासी समाजाची आहे म्हणजेच १०.४३ कोटी पेक्षा जास्त भारताच्या भूमीत वास्तव्य करीत आहेत. भारतीय आदिवासी समाजामध्ये विविध जमातींचा समावेश होत असून त्यांची संख्या ६३५ पर्यंत असल्याचे दिसते[३].

सन २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१०५.६९ लाख एवढी आहे तर आदिवासी समाजाची लोकसंख्या १०४२.८१ लाख एवढी आहे. भारतातील एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ८.६१ प्रतिशत एवढे आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारताची साक्षरता दर ७३ टक्के एवढे आहे तर आदिवासी समाजातील साक्षरता दर ५९ टक्के आहे. यावरून साक्षरतेच्या प्रमाणात आदिवासी समाज शैक्षणिक दृष्टीने किती मागे आहे हे लक्षात येते. भारतामध्ये आदिवासी म्हणून संबोधल्या गेलेल्या समूहांना भारतीय घटनेत अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला

आहे. सन २००३ मध्ये ८९ वी घटनादुरुस्ती करून अनुसूचित जमातीसाठी भारतात स्वतंत्र आयोग निर्माण करण्यात आला आहे.

भारताच्या सर्व भागात आदिवासी समाज विखुरलेल्या असल्याचे दिसते. भारतीय आदिवासी समाजाचे अभ्यासात भारतातील आदिवासींचे वर्गीकरण पाच प्रादेशिक विभागात करतात ते पुढील प्रमाणे-

१) उत्तर पूर्व विभाग- या विभागामध्ये चंदिगड, दिल्ली, हरियाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, पंजाब, राज्यस्थान या राज्यांचा समावेश होतो.

२) मध्य विभाग - या विभागामध्ये मध्य प्रदेश छत्तीसगड उत्तर प्रदेश उत्तरांचल प्रदेश या राज्यांचा समावेश होतो.

३) दक्षिण विभाग - या विभागांमध्ये आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू या राज्यांचा तर अंदमान निकोबार, लक्षद्वीप, पांडेचेरी या केंद्रशासित प्रदेशांचा समावेश होतो.

४) पश्चिम विभाग - या विभागामध्ये गोवा, गुजरात, महाराष्ट्र या राज्यांचा तर दादरा व नगर हवेली, दमन व दीव या केंद्रशासित प्रदेशांचा समावेश होतो.

५) पूर्व विभाग- या विभागामध्ये बिहार, झारखंड, ओरिसा, पश्चिम बंगाल या राज्यांचा समावेश होतो.

६) उत्तर पूर्व विभाग (ईशान्य विभाग) - या विभागामध्ये सिक्कीम, आसाम, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मिझोराम, मेघालय, मणिपूर या राज्यांचा समावेश होतो.

सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण आदिवासींची लोकसंख्या १०.४३ कोटी आहेत त्यापैकी १०५.१० लाख आदिवासी लोकसंख्या महाराष्ट्र राज्याचा आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११.२४ कोटी असून त्यामध्ये आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ९.३५ टक्के आहे देशातील आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याचा दुसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्र

राज्यात आदिवासींची लोकसंख्या प्रामुख्याने धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक व ठाणे (सह्याद्री प्रदेश), चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, नागपूर, अमरावती, व यवतमाळ (गोंडवान प्रदेश) या पूर्वेकडील वनाच्छादित जिल्ह्यांमध्ये अधिक आहे. महाराष्ट्रातील आदिवासींच्या वास्तव्यानुसार तीन विभाग पाडले जातात ते पुढील प्रमाणे-

१) सातपुडा विभाग २) गोंडवाना विभाग ३)सह्याद्री विभाग

**१.२ आदिवासींचा अर्थ :**

भारतीय समाज व्यवस्थेमधील एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून आदिवासी समाजाकडे बघितले जाते. देशाचा आर्थिक विकास घडवून येत असताना सर्व समाजाचा विकास समान पद्धतीने घडून यावा असे अभिप्रेत असते. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखील आदिवासी समाज जीवनाच्या मुख्य प्रवाहापासून अलिप्त आहे. भारतात ब्रिटिशांची राजवट सुरू झाल्यानंतर सरकारी अधिकाऱ्यांच्या सोयीकरिता विविध जमातींचा अभ्यास करण्यात आला आणि विविध भागातील जमातींची गॅझेटीयर्समध्ये नोंद करण्यात आली. त्यावेळी अभ्यासकांनी आदिवासी जमातींसाठी मागात जमाती, डोंगरदऱ्यात राहणाऱ्या जमाती यासारख्या वेगवेगळया शब्दांचा वापर केला. आदिवासीची काही व्याख्या पुढील प्रमाणे.

1. **इंपिरीयल गॅझेटनुसार व्याख्या :** 'समान बोलीभाषा बोलणाऱ्या, एकाच भूभागत राहणाऱ्या,सुरवातीस अंतर्विवाहि असण्याची शक्यता असणाऱ्या, पण सर्व सामान्यपणे अंतर्विवाहि नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या कुटुंबाच्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात[७].'
2. **गिलिन व गिलिन यांची व्याख्या :** 'एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व एकच (समान) सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटाच्या समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात[८].'

आदिवासींचे अभ्यासक विचारवंत, प्रशासक व सामाजिक कार्यकर्ते यांनी आदिवासींना गिरीजन व वनवासी अशा विविध नावांनी संबोधले आहे. आदिवासी म्हणजे त्या त्या ठिकाणाचे मूळ रहिवासी किंवा मूळ निवासी असा अर्थ लावल्या जातो. आदिवासी हा शब्द इंग्रजीतील 'ॲब-ओरिजनल्स' या शब्दाचा मराठी पर्याय शब्द आहे. Aboriginals किंवा Aboriginols याचा अर्थ अगदी मुळचे रहिवासी किंवा प्राचीन असा होतो. रिस्ले, एल्विन,थुर्बन, सेडविक, मार्टीन, ग्रिगसन तसेच ए. व्ही. ठक्कर इत्यादी अभ्यासकांनी या शब्दाचा प्रयोग आपल्या लेखनात केला आहे. डॉ. धुर्ये यांनी मात्र 'So called aborigines' म्हणजेच तथाकथित मूळ निवासी किंवा Backward Hindus, मागासलेली हिंदू असा आदिवासींचा उल्लेख केला आहे.

महाराष्ट्र राज्यातील हिंगोली हा एक जिल्हा आहे. राष्ट्रसंत नामदेव यांची जन्मभूमी आणि बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग औंढा नागनाथ असलेल्या हिंगोली जिल्ह्याची निर्मिती १ मे १९९९ मध्ये झाली. परभणी जिल्ह्याचे विभाजन करून हिंगोली, कळमनुरी, वसमत आणि औंढा नागनाथ या पाच तालुक्यांचा हिंगोली जिल्हा निर्माण करण्यात आला. या जिल्ह्यात अध्ययनासाठी निवडलेल्या कळमनुरी तालुक्याचा समावेश आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ११,७७,३४५ एवढी असून एकूण लोकसंख्येपैकी हिंगोली तालुक्यात २२.८९ टक्के, कळमनुरी तालुक्यात १९.६७ टक्के, वसमत तालुक्यात २४.७१ टक्के, सेनगाव तालुक्यात १७.३४ टक्के आणि औंढा नागनाथ तालुक्यात १५.३९ टक्के लोकसंख्या वास्तव्य करते. सन २०११च्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ११७७ हजार असून आदिवासी लोकसंख्या ११२ हजार आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्या पैकी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ९.५ टक्के एवढे आहे. जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येचे सर्वाधिक प्रमाण कळमनुरी तालुक्यात आहे. हिंगोली जिल्ह्यातील तालुका निहाय आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण विचारात घेतले असता कळमनुरी तालुक्यात सर्वाधिक १८.८ टक्के नंतर औंढा नागनाथ तालुक्यात १५.६८

टक्के, सेनगाव तालुक्यात ६.६७ टक्के, हिंगोली तालुक्यात ६.२१ टक्के आणि वसमत तालुक्यात ३.२१ टक्के असे आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण असल्याचे दिसून येते.

### १.३ संशोधन विषयाची निवड:

आदिवासी भागा आणि इतर भाग यांची तुलना केली असता आदिवासी भागांमध्ये असणाऱ्या विविध सोयी सुविधा अत्यंत कमी आहेत. आदिवासी समाजाकडे उत्पन्नाचे निश्चित असे साधन नसल्याने हे आदिवासी लोक विकासापासून वंचित आहेत. आदिवासी समाजाकडे जलसिंचनाच्या कोणत्या सुविधा उपलब्ध नसल्याने हंगामी शेती करणे एवढाच पर्याय आदिवासी लोकांसमोर असतो. आदिवासी लोकांमध्ये अंधश्रद्धेचे व व्यसनाधीनतेचे प्रमाण अधिक असल्याने आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासावर त्याचा दुरागामी परिणाम झालेला दिसून येतो. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५१ पासून आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी भारतात नियोजनबद्ध विकास करायला प्रारंभ झाला. परंतु या विकास प्रक्रियेत आदिवासी समाज उपेक्षित व दुर्लक्षित राहिला आहे. अशा उपेक्षित व विकासापासून कोसो दूर असलेल्या आदिवासी समाजाचे आर्थिक अध्ययन करण्याचे ठरले व **'आदिवासी समाजाच्या सक्षमीकरणाच्या शासकीय योजनांचा अर्थशास्त्रीय अभ्यास : विषय संदर्भ कळमनुरी तालुका'** हा विषय लघु शोध प्रकल्पासाठी निवड करण्यात आला.

### १.४ संशोधनाची उद्दिष्टे:

प्रस्तुत लघु शोध प्रकल्पासाठी पुढील उद्दिष्टे निर्धारित करण्यात आली आहेत-

१) आदिवासी समाजातील दारिद्र्याचा अभ्यास करणे
२) आदिवासी लोकांच्या उत्पन्नाच्या विविध मार्गाचा अभ्यास करणे
३) आदिवासी समाजाचे राहणीमान तपासणे
४) आदिवासी समाजासाठी असलेल्या शासकीय योजनांचा आढावा घेणे
५) शासकीय योजनांचा आदिवासींना झालेला लाभ तपासणे

### १.५ संशोधनाची गृहितके:

प्रस्तुत लघु शोध प्रकल्पाची गृहीतके पुढीलप्रमाणे आहेत-

१) शासकीय योजनांमुळे आदिवासींच्या उत्पन्नात वाढ होत आहे
२) आदिवासींच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा होत आहे
३) बहुतांश आदिवासी कुटुंबे दारिद्र्यात जीवन जगतात
४) शासकीय योजनांचा लाभ आदिवासींपर्यंत पोहोचत नाही
५) आदिवासी समाजात व्यसनाचे प्रमाण अधिक आहे

### १.६ संशोधन पद्धती:

प्रस्तुत लघु शोध प्रकल्पासाठी प्राथमिक (Primary Data) आणि द्वितीय (Secondary Data) आधार सामग्रीचा वापर करून संशोधनाचे कार्य पूर्ण केले आहे.

**अ) प्राथमिक आधार सामग्री -**

प्राथमिक आधार समग्रीचे अध्ययन करतांना आदिवासी समाजातील दारिद्रय, कर्जबाजारीपणा, व्यसनाधीनता,भूमीहीनता, शोषण, बेरोजगारी, आदिवासी विकासासाठी वन हक्क जमीन, घरकूल, याचबरोबर आर्थिक उन्नतीच्या योजना, शिक्षण विषयक योजना, इत्यादीचे सखोल अध्ययन करण्यासाठी मुलाखत अनुसूचीच्या सहयाने प्रत्यक्ष मुलाखती घेऊन तथ्य संकलन करण्यात आले.

**ब) द्वितीय आधार सामग्री :**

द्वितीय स्वरूपाची माहिती संकलन करण्यासाठी विविध पुस्तके, संदर्भ ग्रंथ, मासिके, नियतकालिके, तसेच शासकीय पातळीवर प्रकाशित झालेले विविध अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, आदिवासी संशोधन पत्रिका, लोकराज्य आदिवासी विकास विशेषांक, वृत्तपत्रे, संशोधन प्रबंध, आणि विविध संकेतस्थळ इत्यादींचा आधार घेऊन आदिवासी जीवन पद्धती, त्याच्या आर्थिक समस्या आणि आदिवासी विकास योजनांची माहिती संकलित करण्यात आली.

**क) नमूना निवड प्रक्रिया :**

संशोधनासाठी कळमनुरी तालुका समग्र म्हणून निवडण्यात आला. या तालुक्यातील एकूण १५ गावांची निवड करण्यात आली. या गावांची निवड करतांना ज्या गावात एकूण लोकसंख्येच्या ७५ टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या आदिवासीची आहे त्या गावांची निवड करण्यात आली. या तालुक्यामध्ये ७५ टक्के पेक्षा आदिवासी लोकसंख्या असलेली गावे असल्याने सहेतुक नमूना निवड पद्धतीने १५ गावांची निवड करण्यात आली.तसेच प्रत्येक गावातून सहेतुक नमूना निवड पद्धतीने एकूण १५ कुटुंबाची निवड करण्यात आली. अशा प्रकारे समग्रामधून एकूण २२५ नमुने अध्ययनासाठी निवडण्यात आले.

**तक्ता क्र. १.१**

**नमूना पाहणीसाठी निवडलेल्या गावाची नावे**

| अ. क्र. | गावाचे नाव | एकूण लोकसंख्येपैकी आदिवासी लोकसंख्या | नमूना पाहणी कुटुंब संख्या |
|---|---|---|---|
| १ | भुरक्याची वाडी | ९९% | १५ |
| २ | बिबगव्हान | ८४% | १५ |
| ३ | बोल्डावाडी | ९९% | १५ |
| ४ | बोथु | ९२% | १५ |
| ५ | ढोलक्याची वाडी | ९९% | १५ |
| ६ | गरोल्याची वाडी | ९५% | १५ |
| ७ | गूलडाल वाडी | ९४% | १५ |
| ८ | जामगव्हान | ८१% | १५ |
| ९ | कवडा | ९८% | १५ |
| १० | खापर खेडा | ९५% | १५ |
| ११ | कोपरवाडी | ९९% | १५ |
| १२ | वाई | ९५% | १५ |
| १३ | तलंगवाडी | ९९% | १५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | रामवाडी | ९९% | १५ |
| १५ | नरवाडी | ९१% | १५ |
| **एकूण** | | | **२२५** |

(संदर्भ – १.प्रत्यक्ष नमूना पाहणी २. https://www.census2011.co.in)

## १.७ संशोधनाचे महत्व :

भारतामध्ये अनेक प्रकारच्या आदिवासी जमाती वास्तव्य करतात. भारतामध्ये आदिवासींची लोकसंख्या १० कोटी ४२ लाख पेक्षा अधिक असून महाराष्ट्र राज्यामध्ये १ कोटी ०५ लाख पेक्षा अधिक आहे. बहुसंख्य आदिवासी जमातीची लोकसंख्या सामाजिक. आर्थिक व शैक्षणिक दृष्टीने मागासलेली आहे. त्यामुळे या अध्ययन विषयाचे विशेष महत्व आहे.

प्रस्तुत लघु शोध प्रकल्प हे नवीन असून अध्ययन क्षेत्रातील आदिवासी समाजाचे आणि आदिवासी विकास योजनांचे अध्ययन करण्यासाठी नमूना निवड पद्धतीने अध्ययन क्षेत्रातील नमूना निवड करून तथ्य संकलनाच्या संध्यानद्वारे विश्वसनीय तथ्य संकलित करण्यात आले. तथ्यांचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले. यावरून आदिवासी विकास योजानांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी आणि त्या योजनाचा लाभधारकांना प्रत्यक्ष लाभ प्राप्त होण्यासाठी ठळक बाबी लक्षात आल्या. याच दृष्टीने अध्ययन विषय हा महत्वाचा आहे.

## १.८ संशोधनाची व्याप्ती:

प्रस्तुत लघु शोध प्रकल्प हिंगोली जिल्ह्यावर आधारित आहे त्यामुळे हा अभ्यास केवळ हिंगोली जिल्हा पुरता मर्यादित आहे मात्र त्यात हिंगोली जिल्ह्यातील केवळ कळमनुरी तालुक्यातील आदिवासी समाजाचे अध्ययन करण्यात आहे.

## १.९ संशोधनाची मर्यादा:

प्रस्तुत लघु शोध प्रकल्प हिंगोली जिल्ह्यांमध्ये असलेले एकूण लोकसंख्येपैकी केवळ कळमनुरी तालुक्यातील आदिवासी समाजातील लोकांचा अभ्यास करण्यापूरतेच

मर्यादित असून आदिवासींच्या विकासासाठी असलेल्या विविध योजना पैकी काही निवडक योजनांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

### १.१० प्रकरण रचना

१. **प्रकरण पहिले -** प्रस्तावना व संशोधन पद्धती

२. **प्रकरण दुसरे -** संशोधन साहित्याचा आढावा

३. **प्रकरण तिसरे -** हिंगोली जिल्ह्याची पार्श्वभूमी

४. **प्रकरण चौथे -** आदिवासींसाठी असलेल्या शासकीय योजनांचा अभ्यास

५. **प्रकरण पाचवे** – आदिवासी समाजाचे आर्थिक विश्लेषण

६. **प्रकरण सहावे -** निष्कर्ष व शिफारशी

**संदर्भसूची:**


१) डॉ. तेगमपुरे मारुती : 'आदिवासी विकास आणि वास्तव' चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद (२००९) पृ. क्र. १४.

२) प्रा.हगौतम निकम: "मूलनिवासींचे खच्चीकरण" विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगाव (२०१२) पृ. क्र. १६

३) डॉ. सो. देवगावकर शैलजा, डॉ. देवगावकर एस. जी. : 'आदिवासी विश्व' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर (३०१६) पृ. क्र. ६, १२५.

४) प्रा. सरकुंडे माधव : 'आदिवासी अस्मितेचा शोध" देवयानी प्रकाशन, यवतमाळ (२०११) पृ. क्र. ०८.

५) डॉ. देवगावकर एस. जी. : "आदिवासी विकास प्रशासन' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर (२०१६) पृ. क्र. २५.

६) डॉ. कुलकर्णी शौनक : महाराष्ट्रातील आदिवासी डायमंड पब्लिकेशन, पुणे (२००९) ,पृ. क्र. ०२.

७) नाडगोंडे गुरूनाथ (२०१२) : 'भारतीय आदिवासी' कॅंटिनेन्टल प्रकाशन, पुणे. पृ. क्र. ०३.

८) प्रा. डॉ. देशमुख सुदर्शन (२००७) 'आदिवासी समाजाचे दारिद्र्य'निर्मल प्रकाशन,नांदेड. पृ. क्र. ६३.

# प्रकरण दुसरे

# संशोधन साहित्याचा आढावा

## २.१ प्रस्तावना :

भारतीय आदिवासींच्या प्रश्नांकडे २०व्या शतकाच्या पूर्वार्धापासून अधिक लक्ष देण्यात सुरुवात झाली. आदिवासींचे जीवनमान, वास्तव्य, आर्थिक क्रिया, कुटुंब पद्धती, परंपरा, खानपान, पोशाख, संस्कृती इत्यादींचे अध्ययन बऱ्याच मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात झालेले आहे. अलीकडील काळात आदिवासींना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी संविधानात्मक विशेष तरतुदी द्वारे सरकार प्रयत्न करीत आहे. शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वावलंबन, नोकरी, इत्यादी बाबी आदिवासी समाजापर्यंत पोहोचत असल्याने अनेक अभ्यासक, संशोधक, समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, समाजसेवक, साहित्यिक, शासनाचे अहवाल इत्यादी मार्फत आदिवासी समाजाचे सूक्ष्म व समग्र पातळीवर अध्ययन झालेले आहे. आदिवासी समाज या विषयावर ज्या अभ्यासकांनी, संशोधकांनी अध्ययन केले आहे, त्या संशोधन साहित्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न या प्रकरणात करण्यात आला आहे. संशोधन साहित्याचा आढावा घेणे म्हणजे संशोधन विषयाशी निगडित अभ्यासाचा आढावा घेणे होय. त्यामुळे आपले संशोधन हे इतर संशोधनापेक्षा वेगळे कसे आहे हे समजून घेण्यास मदत होते, तसेच आपण संशोधनासाठी निवडलेला विषय इतर संशोधन साहित्यापेक्षा वेगळी पार्श्वभूमी असलेला आहे हे स्पष्ट होते.

प्रस्तुत लघु शोध प्रकल्पात "आदिवासी समाजासाठी असलेल्या शासकीय योजनांचा अर्थशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ कळमनुरी तालुका" या विषयाचा अभ्यास करण्यात आला आहे. हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाज हा अध्ययनाचा केंद्रबिंदू करण्यात आला आहे. त्या दृष्टीने पूर्वीचे संशोधन उपस्थित अध्ययनास पुरक व मार्गदर्शक ठरणार आहेत. त्या संशोधनातून प्रस्तुत संशोधन अध्ययनाची दिशा ठरविणे

शक्य झाले. या पूर्वप्रकाशीत संशोधन साहित्याचे अध्ययन केल्यानंतर सदर संशोधनातील वास्तव आणि वेगळेपणा स्पष्ट करणे सुलभ झाले. प्रस्तुत अध्ययन करताना आदिवासींच्या विविध जमातीवर झालेल्या संशोधनाचा लिहिण्यात आलेल्या पुस्तकांचा व प्रकाशित लेखांचा आढावा खालील प्रमाणे घेतला आहे.

## २.२ प्रकाशित साहित्याचा आढावा :

### १) प्रा. डॉ. देशमुख सुदर्शन (२००७)[१]

यांनी लिहिलेल्या "आदिवासी समाजाचे दारिद्र्य" या पुस्तकामध्ये ग्रामीण दारिद्र्याच्या तुलनेत आदिवासी भागातील किंवा खेड्यातील दारिद्र्याची तीव्रता अधिक आहे असे स्पष्ट केले. दारिद्र्याच्या दृष्ट चक्रात अडकलेल्या आदिवासी खेड्यातील कुटुंबांना कारणीभूत ठरणाऱ्या व इतर संबंधित घटकाचा अभ्यास करून दारिद्र्याचे प्रमाण, स्वरूप, सामाजिक वैशिष्ट्ये, जंगल संबंध, उत्पन्न व रोजगार, विकास योजना लाभ व अडचणी, उपभोग, दारिद्र्याची कारणे याविषयी माहिती मिळवण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे. या ग्रंथातील प्रमुख निष्कर्ष पुढील प्रमाणे-

१) आदिवासी उपयोजना क्षेत्रात ९०.८३ टक्के सर्वाधिक कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील जीवन जगतात.
२) महाराष्ट्रातील बहुतांश आदिवासी कुटुंबे भूमिहीन असून जवळ जवळ ८० टक्के कुटुंबे अल्पभूधारक आहेत.
३) वाढती बेकारी व दारिद्र्य, सुपीक जमिनीचा अभाव, अपुरे पोषण, शाळेतील विद्यार्थ्यांची गळती, धर्मांतराचा प्रश्न, सांस्कृतिक पतन ही आदिवासींच्या मागासलेपणाची कारणे आहेत.
४) आदिवासी जमातींची संख्या भारतात मोठी असून हा समाज आज मोठ्या संख्येने दारिद्र्यात जीवन जगत आहे. सुधारणा होत आहे पण सुधारणांचा वेग बंद आहे.

५) मोठ्या आदिवासी शेतकऱ्यांच्या तुलनेत बिगर आदिवासी मोठे शेतकरी सुधारित बियाण्याचा वापर जास्त करतात.

६) सीमांत आदिवासी शेतकरी व बिगर आदिवासी सीमांत शेतकरी सुधारित बियाण्याचा समप्रमाणात वापर करतात.

**२) कोडीतकर सुरेश (२००८)[२] :**

आदिवासी लोकांची वैचारिक,आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी कोणी काय काय प्रयत्न केले, याचा शोध घेण्याचा प्रयत्न "आदिवासी जीवन कथा आणि व्यथा" या पुस्तकात सुरेश कोडीतकर यांनी केला आहे. आदिवासी समाजाचा इतिहास आजच्या पिढीला माहीत होण्यासाठी, आदिवासी समाजाच्या मनात असलेली मागासलेपणाची भावना दूर व्हावी यासाठी आणि इतर समाजाने या आदिवासी समाजाला जवळ घ्यावे, त्यांच्या भागाचा विकास व्हावा यासाठी प्रस्तुत पुस्तकाच्या माध्यमातून लेखकाने प्रयत्न केला आहे.

आदिवासी समाजात कायम डोंगरकपारी, जंगलामध्ये राहणारा समाज आहे. तो नेहमीच मुख्य प्रवाहापासून फार दूर, अलिप्त आहे. या आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामाजिक न्यायाची चौकट आदिवासी समाजापर्यंत पोहोचवायला हवी. आदिवासी समाजाला सामाजिक न्यायाच्या चौकटीच्या आत आणण्याकरिता संसदीय समिती समोर असलेल्या सध्याच्या विधेयकातील काही मुद्द्यावर विचार करून आदिवासी समाजाकरिता आणि जंगल संरक्षणाकरिता योग्य अशा तरतुदी निर्माण कराव्या लागतील तरच आदिवासी समाजाला मूलभूत गरजा प्राप्त होऊ शकतील असे मत प्रस्तुत लेखकाने मांडले आहे. आदिवासी भाग हा डोंगर दर्यात, कडा-कपारी, जंगलझाडी असा असतो. हा विभाग जंगल संपत्तीने आणि खनिज संपत्तीने समृद्ध असतो, संपत्तीने समृद्ध असलेल्या भागावर आदिवासींचे राज्य असते. आदिवासी लोक स्वतःला जंगलाचे राजे समजतात तरी त्यांच्या घरी अठरा विश्व दारिद्र्य असते. अशी शोकांतिका या ग्रंथात मांडली आहे. तसेच गुजरात राज्यातील डांग जिल्ह्यातील आदिवासी लोकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीची कल्पना स्पष्ट

केली आहे. गुजरात राज्याला डांग जिल्हा म्हणजे लाभलेले वरदान आहे. या जिल्ह्याला निसर्गाने अतिशय सुपीकता आणि भरपूर निसर्ग संपत्ती अर्पण केली आहे. या जिल्ह्यात विक्रमी पाऊस पडतो तरीही या जिल्ह्याचा विकास अपेक्षेप्रमाणे झालेला नाही. त्यामुळे विकास गंगेचा प्रवाह आदिवासी समाजापर्यंत पोहोचणार कसा? प्रश्न लेखनाने मांडलेला आहे. डांग जिल्ह्यातील केवळ १२ टक्के लोकशाही भागात राहतात तर बाकी सर्व लोक जिल्ह्यातील ३०९ खेड्यात राहतात. डांग जिल्ह्यातील लोकांच्या घरांचा दर्जा निकृष्ट असल्याचे वास्तव लेखाने मानले आहे.

### ३) घाटे निरंजन (२००९)[३] :

आज बऱ्याच आदिवासी जमाती नाहीशा होत चालल्या आहेत, त्यांच्याबरोबर पारंपरिक वारसा असलेले ज्ञानही नाहीसे होत आहे. जगभरातील या आदिवासी जमातींची माहिती करून घेतल्यास, किती वेगवेगळ्या भौगोलिक परिस्थितीत माणूस पोहोचला, जगला आणि वाढला, हे निरंजन घाटे यांनी 'आदिवासींचे अनोखे विश्व" या पुस्तकांमध्येसादर केलेले आहे.

'मिंगू एक नाहीशी होत चाललेली जमात' या लेखात निरंजन घाटे लिहितात, ब्राझिलियन राखीव इंडियन (आदिवासी) भाग ब्राझीलच्या मारो प्रांतात आहे. तो ब्राझीलच्या अतिशय दुर्गम भागातील आणि आधुनिक जगापासून सर्वात दूर असलेल्या मिंगू आदिवासींसाठी आरक्षित वनक्षेत्राचा भाग आहे. या ठिकाणी १६ वेगवेगळ्या आदिवासी वसाहतीमध्ये दोन हजार आदिवासी राहतात. हा दुर्गम भाग साधारणपणे पुणे जिल्हा एवढा किंवा फार तर थोडा मोठा असेल. एकेकाळी ब्राझीलमध्ये चाळीस लक्ष आदिवासी होते. आज जेमतेम दोन लक्ष आदिवासी शिल्लक आहेत. ओलांडोच्या मते ते जनतेने एक लक्ष शिल्लक आहेत. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात शंभर आदिवासी जमाती नाहीशा झाल्यात. आज ब्राझीलच्या कॅथॉलिक ख्रिश्चन लोकसंख्येच्या नऊ टक्के असलेल्या या आदिवासींचा भवितव्य धूसर आहे. असे मत प्रस्तुत पुस्तकांमध्ये लेखकाने मांडले आहे.

### ४) डॉ. मारोती तेगमपुरे (२००९)४ :

"आदिवासी विकास आणि वास्तव" या ग्रंथात आदिवासी उपयोजनाची माहिती, उपयोजनाची निर्मिती, आदिवासी उपयोजनाची पूर्वतयारी, आदिवासी उपयोजना कार्यक्रमाची आखणी, आदिवासी उपयोजनाची उद्दिष्टे आणि धोरणे, विभागीय कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे आणि घोरणे, अति महत्त्वाचे कार्यक्रम, आदिवासी उपयोजनांसाठी आर्थिक स्त्रोत आणि खर्चाचा आराखडा, प्रशासकीय यंत्रणेची उभारणी, प्रकल्पासाठी विभागाची निवड व भौगोलिक स्थिती यासंदर्भातील विस्तृत विवेचन या ग्रंथामध्ये केलेले आहे. तसेच महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना, आदिवासी उपयोजनाची पार्श्वभूमी, सुकथनकर समितीच्या मुख्य शिफारशी, आदिवासी योजना क्षेत्रातील अग्रक्रम क्षेत्र, महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजनाची प्रशासकीय यंत्रणा, प्रकल्प स्तरीय समिती, आदिवासी उपयोजना तयार करण्याची पद्धती आणि आदिवासी उपयोजने खाली राबविले जाणारे शीर्ष निहाय उपक्रम या सर्व बाबींचे सविस्तर विश्लेषण केले आहे. किनवट तालुक्यामध्ये महाराष्ट्रात राबविल्या जाणाऱ्या आदिवासींच्या विकास कार्यक्रमातील कृषी व संलग्न सेवा ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम पाटबंधारे व पूरण नियंत्रण विद्युत विकास उद्योग व खनिजे वाहतूक दळणवळण आणि सामाजिक व सामूहिक सेवा इत्यादी विकास कार्यक्रम राबविले जातात त्याकरिता या विकास शिर्षावर नियत वेगळ्या करून प्रत्यक्ष खर्च केला जातो याबाबत अध्ययन करून प्रस्तुत ग्रंथात काढलेले काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष पुढीलप्रमाणे-

१) आदिवासी उपयोजनेसाठी प्राप्त होणाऱ्या विशेष केंद्रीय सहाय्याच्या महाराष्ट्रात अभ्यास काळातील पंधरा वर्षापैकी केवळ सात वर्षात १०० टक्के प्रत्यक्ष खर्च केला गेला उर्वरित वर्षांमध्ये हा खर्च १०० टक्के पेक्षा कमीच झाला आहे २००३-२००४ यावर्षी तर हा खर्च केवळ ४३.३४ टक्के इतक्याच करण्यात आला.

२) किनवट तालुक्यातील आदिवासी उपयोजनासाठी करण्यात आलेल्या नियत व्ययापैकी १९८९-९० ते २००३-२००४ या पंधरा वर्षाच्या काळात सात वर्षे प्रत्यक्ष खर्च १०० टक्के किंवा यापेक्षा अधिक राहिला आहे. तर अभ्यास

काळातील हा खर्च आठ वर्ष १०० टक्के पेक्षा कमी राहिला असून २००२-२००३ व २००३-२००४ यावर्षी अनुक्रमे ४२.३४ टक्के व ३७.१७ टक्के इतका कमी करण्यात आला.

३) किनवट तालुक्यातील आदिवासी खेड्यात अजूनही आरोग्याच्या सोयीचा पिण्याच्या स्वच्छ पाण्याच्या सोयीचा अभाव आहे पिण्याच्या पाण्याची धारून अवस्था आजही आहे त्यांना नाल्याचे विहिरीचे शेततळ्यातील पाणी पिण्यासाठी वापरावे लागते

४) किनवट तालुक्यातील ५० टक्के आदिवासी लाभार्थी अजूनही निरक्षर असून ३३ टक्के आदिवासींचे केवळ प्राथमिक शिक्षण झाले आहे. आदिवासी उपयोजनेद्वारे शिक्षणावर खर्च करूनही आदिवासींचे निरक्षरतेचे प्रमाण कमी करणे शक्य झाले नाही.

५) किनवट तालुक्यात आदिवासी उपयोजनाची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये अंमलबजावणीच्या संदर्भात कमालीची अनास्था दिसून आली. अनास्था असणाऱ्या अधिकाऱ्यांमुळेही योजना अपयशी ठरली आहे.

**५) डॉ. गारे गोविंद (२०१३)[५] :**

यांनी "आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ" हा ग्रंथ लिहिला आहे. पन्नास वर्षानंतर आदिवासी विकासाची वाटचाल करताना बदलत्या परिस्थितीतील नवे संदर्भ विचारात घेऊन आदिवासींचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न झाले तर अपेक्षित यश साध्य करता येईल यासाठी विविध प्रश्नांची व नव्या संदर्भाची प्रस्तुत ग्रंथात चर्चा केली आहे. आदिवासी की वनवासी? आदिवासींचे आरोग्य महत्त्वाचे अस्तित्व महत्त्वाचे? डांग जिल्ह्यातील आदिवासींचा प्रश्न, कातकरी विकासाची दिशा, ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचे न सुटलेले प्रश्न, आदिवासींच्या वनजमिनीचा प्रश्न, आदिवासी भागातील कुपोषण आणि बालमृत्यूची समस्या, आदिवासी मातांचे आरोग्य, सातपुड्यातील मजुरांची समस्या, आदिवासी जाती प्रमाणपत्रांची तपासणी, दंडकारण्यातील नक्षलवादी चळवळ इत्यादी प्रश्न व समस्यांची चर्चा या ग्रंथामध्ये करण्यात आली आहे.

आदिवासी की वनवासी? या प्रश्नांचे स्पष्टीकरण देताना डॉ. गोविंद गारे लिहितात, राज्यघटनेत आदिवासींचा उल्लेख अनुसूचित जमाती असा आहे. परंतु त्यामुळे आदिवासी जनसमुहाची सामाजिक ओळख स्पष्ट होत नाही. म्हणून अनुसूचित जमाती ऐवजी आदिवासी या शब्दाचा वापर व्हावा व त्याला घटनात्मक संरक्षण देण्यात यावे असे देशभरातील आदिवासींना वाटू लागले आहे. आदिवासी समाज मूळ निवासी असतानाही काही संस्था, संघटना, राजकीय पक्ष, जाणीवपूर्वक वनवासी हे संबोधन पद्धतशीरपणे रूढ करून पाहत आहेत. आदिवासी या भूमीचे ते मूळ निवासी आहेत. ही कल्पना त्यांना कदाचित नसावी. आदिवासी शब्दात जी अस्मिता आहे, जो स्वयं गौरव आहे, जो आत्मसन्मान आहे, तो वनवासी शब्दात नाही. त्यामुळे त्या शब्दाच्या वापरातून आदिवासींचा स्वाभिमान, अस्मिता आत्मभान, कुठेही उंचावत नाही. भारतात आज कोणत्याही आदिवासींना वनवासी म्हणून घेणे अजिबात पसंत नाही आदिवासी शब्दाने त्यांची मानसिकता जोपासली आहे ती वनवासी शब्द वापरून घालविणे किंवा त्या शब्दातील इतिहास पुसणे हे भारतीय आदिवासी समाजाच्या दृष्टीने घोर अन्यायाचे ठरेल.

**६) लोकराज्य (२०१३)[६] :**

"लोकराज्य" या मासिका मध्ये 'सर्वकष विकासासाठी प्रयत्नशील' या लेखात तत्कालीन आदिवासी विकास मंत्री श्री मधुकरराव पिक्चर यांनी आदिवासी बाबत आपले मनोगत मांडले त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

समाजाच्या मुख्य प्रवाहापासून निर्जन स्थळी राहणाऱ्या आदिवासी जमातींना महाराष्ट्र शासनाने क्रांतिकारी पावले उचलत सन्मान मिळवून दिला आहे. या सर्व अनुसूचित जमातींचा विकास करण्यासाठी शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवारा या मूलभूत गरजांसह या समाजाच्या विकासाकरिता आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांच्या निर्मितीतून आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन स्तरावर विविध उपक्रम राबविले जात आहे. देशात सर्वप्रथम राज्यातील आदिवासींची लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्राप्रमाणे अर्थसंकल्पात वेगळी तरतूद करण्याचे भाग्य

त्यावेळी चे मुख्यमंत्री श्री शरद पवार यांच्या प्रयत्नाने व आदिवासी विकास मंत्री म्हणून मला लाभले आहे. राज्यात असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात एकूण अर्थसंकल्पीय तरतुदीच्या नऊ टक्के प्रमाणे ४,१७७ कोटी रुपये एवढा निधी आदिवासींसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी आणि कल्याणासाठी ज्या योजना स्थळ काळानुरूप आवश्यक आहेत अशा योजना स्थानिक पातळीवर तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वित करून गरजू आदिवासींना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्यूक्लिअस बजेट) ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेची प्रति लाभार्थी अनुदान मर्यादा पंधरा हजार रुपये भरून पन्नास हजार रुपये करण्यात आली आहे. आदिवासी मुलांना उत्तम शिक्षणाची संधी निर्माण व्हावी म्हणून राज्यात ५५२ शासकीय आश्रम शाळा तर ५५६ अनुदानित आश्रम शाळा कार्यरत आहेत. या सर्व शाळांमध्ये एकूण ४,१९,५५२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. याशिवाय ४८१ शासकीय वस्तीगृहामध्ये ३३,३६४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिष्यवृत्तीची हमखास प्रतिपूर्ती होण्यासाठी ई-विकास या कार्यक्रमांतर्गत ई-शिष्यवृत्ती हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विद्यार्थी आणि शिक्षण संस्था यांना वेळेत शिष्यवृत्ती रक्कम उपलब्ध व्हावे यासाठी etribal.gov.in ही वेबसाईट सुरू करण्यात आली आहे.

### ७) डॉ. बी. एन. आकरे (२०१४)[७] :

आदिवासींची ओळख हे पुस्तक डॉ. भागवत नामदेव आकरे यांनी लिहिले असून आदिवासी समाजाविषयी त्यांना असलेला जिव्हाळा यातूनच प्रस्तुत पुस्तकाची निर्मिती केली आहे. आदिवासींच्या विकासासंबंधी शासनाच्या विविध योजना असून ही अजून पर्यंत आदिवासींचा पूर्णपणे विकास का झाला नाही? शासनाच्या विविध योजना पासून अजूनही ते वंचित का आहेत? असे प्रश्न वारंवार त्यांना भेडसावत होते. त्यावर त्यांनी सखोल अध्ययन केले. आदिवासी क्षेत्रात प्रत्यक्ष जाऊन त्यांच्याशी संपर्क साधला. त्यातून 'आदिवासींची ओळख' या पुस्तकाची निर्मिती केली आहे. प्रस्तुत पुस्तकातील काही मुद्दे पुढीलप्रमाणे-

१) भारतीय राज्यघटनेनुसार ५५० आदिवासी समूहांचा अनुसूचित जमातींच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. भारताच्या विभाजन नंतर १९५१ मध्ये भारतीय आदिवासींची संख्या १.१९ कोटी म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या ८.०८ टक्के होती. इ.स. २००१ मध्ये ८.८६ टक्के एवढी झाली.

२) गोंडवण विभागातील गोडांची संख्या सर्वाधिक असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्रातील आदिवासी जमातीत गोंड ही आदिवासी जमात सर्वाधिक आहे.

३) आदिवासी कल्याणाकरिता भारत सरकारने पंचवार्षिक योजनेत आदिवासी विभागाकरिता केलेल्या विशेष तरतुदी खालील प्रमाणे-

| **पंचवार्षिक योजना** | **अर्थ प्रबंध** |
|---|---|
| प्रथम पंचवार्षिक योजना. | १९.८४ कोटी रू. |
| द्वितीय पंचवार्षिक योजना | ४३.०० कोटी रू. |
| तृतीय पंचवार्षिक योजना | ६०.४३ कोटी रू. |
| चतुर्थ पंचवार्षिक योजना | ३७५.०० कोटी रू. |
| (अनुसूचित जाती जमाती करिता) | |
| पाचवी पंचवार्षिक योजना | १२०.०० कोटी रू. |
| सहावी पंचवार्षिक योजना | ३००.०० कोटी रू. |

४) भारतीय समाज व्यवस्थेचे ग्रामीण, नागरी व वनवासी (आदिवासी) असे तीन पदरी स्वरूप आहे.

५) आदिवासी लोकांच्या जीवनात दारूला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. आदिवासी व दारू यांचे अतुट नाते आहे. दारू त्यांच्या समाजिक व धार्मिक जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे. मूल जन्मल्याबरोबर त्यांच्या तोंडात दारूचे दोन थेंब टाकतात तसेच मृत देहाच्या तोंडात देखील दारूचे थेंब पडल्याशिवाय त्याची सुटका होत नाही.

६) आदिवासींची आर्थिक व सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन मध्यवर्ती सरकारने आदिवासी विकासासाठी एकात्मिक क्षेत्र विकास पद्धतीचा अवलंब करून 'आदिवासी उपयोजना' तयार करण्याचे मार्गदर्शन सर्व राज्य शासनाला दिले. त्यानुसार १४ जिल्ह्यातील ६७ तालुक्यातील आदिवासी उपयोजना व अतिरिक्त आदिवासी उपयोजनामध्ये एकूण ६५ गावांचा व १३ शहरांचा समावेश करण्यात आला आहे.

## ८) योजना (२०१४)[८] :

योजना या विकास समर्पित मासिकामध्ये संपादकीय भाषांतर निवेदिता भारेकर यांनी केले आहे. यातील काही मुद्दे खालील प्रमाणे-

१) भारतीय संविधानाच्या २४४ व्या कलमानुसार देशातील सर्व पारंपरिक अनुसूचित जमातींच्या संस्कृती, कला व भूप्रदेशाचे जतन करणे, भारत सरकारचे तसेच सर्व भारतीयांचे कर्तव्य आहे

२) ब्रिटिश राजवटीच्या आधीपासूनच भारतातील शेती व जमिनीशी संबंधित सर्व कायदे अनुसूचित जाती व जमातींच्या विकासाला प्रतिकूल ठरणारे होते. १८९४ मधील भूमी संपादन कायदा असो किंवा १९२७ चा भारतीय वन्य कायदा असो आदिवासींच्या पारंपारिकतेला जपणारी नैसर्गिक जमीन विनासायास संपादनाचे अधिकार सरकारला मिळाले होते. हे आणि नंतरच्या काळात आलेले अनेक जाचक अन्याय कायदे सर्वच मुळ निवासी जमातींच्या विकासामध्ये अडसर ठरले आहेत.

३) भारतीय संविधानातील कलम ५ व ६ अंतर्गत आदिवासींना त्यांच्या मूळ प्रदेशातील जमिनीची मालकी देण्यात आली आहे.

४) भारतीय वन्य कायद्यात आदिवासी जनसमुहांना वन्य प्रदेश व तेथील साधन संपत्तीचा विनियोग दैनंदिन गरजा भागवण्यासाठी करण्याची गरज आहे.

५) मुख्य प्रवाहातील समाजाची तसेच सरकारची उदासीनता व आदिवासींशी संबंधित कायद्यांची काटेकोर अंमलबजावणीच्या अभावामुळे आदिवासी समाजाला आजतागायत अस्तित्वासाठी झाडावे लागले आहे

६) भारतातील आदिवासी समाज कमीत कमी गरजा बाळगून निसर्गाचा समतोल अबाधित राखून समृद्ध जीवन संस्कृती विकसित केली, जी आजच्या आधुनिक जगातल्या वाढत जाणाऱ्या गरजांना गुंतागुंतीच्या मारक जीवनशैलीला स्वयंशासित प्रशासनाची शिकवण देते.

## २.३ अप्रकाशित साहित्याचा (पीएच. डी. शोध प्रबंध) आढावा

### १) कोकाटे चंद्रकांतनामदेवराव (२००९)[१]

कोकाटे चंद्रकांत नामदेवराव यांनी 'हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन' या विषयावर शोध प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे सादर केला. प्रस्तुत संशोधनात हिंगोली जिल्ह्यातील आंध आदिवासी जमातीचे अध्ययन केले आहे. आदिवासी समाजाचे राहणीमान गरीबीचे प्रमाण, व्यवसाय रचना व स्वयंरोजगाराची स्थिती, शैक्षणिक स्थिती, व्यवसायातील स्त्रियांची भूमिका इत्यादी बाबीवर प्रकाश टाकणे तसेच आदिवासी समाज व शासकीय योजनांचा लाभ यांचा मागवा घेणे या उद्दिष्टांना अनुसरून केलेल्या अध्ययनातून प्राप्त निष्कर्ष थोडक्यात पुढील प्रमाणे.

१) महाराष्ट्रातील जवळपास सर्वात जिल्ह्यात आदिवासी कमी अधिक प्रमाणात वस्ती असून राज्यातील जमातीची संख्या ४७ एवढी आहे.
२) राज्यात आढळणारे आदिवासी जमाती तसेच उपजमाती विकासाच्या वेगवेगळया अवस्थेत असून त्यांच्या समस्यांचे स्वरुपही वेगवेगळे आहे.
३) आदिवासी समाज अस्पृश्य नसला तरी तिरस्कृत व उपेक्षित असल्याचे दिसते.
४) हिंदूच्या संपर्कामुळे आदिवासीवर सांस्कृतिक अतिक्रमण होत आहे. यामुळे आदिवासींना त्यांचे मूळ वैशिष्ट्ये, परंपरा इत्यादींचा विसर पडत आहे.
५) प्रगत समाजाच्या संपर्कामुळे काही आदिवासी स्वतःला हिंदू म्हणून घेतात तसेच कालौघात आदिवासींचे हिंदूकरण होताना दिसून येत आहे. असे

असले तरी आदिवासींच्या प्रथा परंपरा आजार विचार संस्कृती भिन्न असल्याने त्यांचा स्वतंत्र आदिवासी धर्म मानावा.

**२) शेकोबा परशुराम ढोले (२०१७)[१०] :**

यांनी 'आदिवासी विकास योजनांचे मूल्यमापन : एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)' या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले. या संशोधनासाठी आदिवासी विकास योजनेचा अभ्यास करणे, आदिवासी विकास योजनांचा लाभधारकांना कितपत फायदा झाला ते अभ्यासणे, आदिवासी समाजासाठी विकासात्मक उपाय योजना सुचवणे इत्यादी उद्दिष्टे निश्चित करण्यात आली. या उद्दिष्टांना अनुसरून प्राप्त झालेले काही निष्कर्ष पुढील प्रमाणे.

१) न्यू संजीवन योजना आदिवासी समाजासाठी उपकारक असून योजनेची उद्दिष्टे चांगले आहेत अध्ययन क्षेत्रात ही योजना आदिवासी लाभधारकाला माहीत नसून या योजनेची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून आले..

२) पूरक व्यवसाय योजनांचा २५.२५ टक्के कुटुंबाला लाभ मिळाला असून ७४.७५ टक्के कुटुंब या योजनांपासून वंचित राहिले आहेत.

३) आदिवासी विकासाच्या घरगुती योजनांची माहिती नसल्याचे प्रमाण ५८.२५% कुटुंब दिसून आले.

४) अध्ययन क्षेत्रातील ६६.७५ टक्के नमुना कुटुंबाला आदिवासी विकास योजनांची परिपूर्ण माहिती नसल्याचे दिसून आले.

५) आदिवासी विकासाचा एकूण निधीच्या ६० टक्के निधी जिल्हास्तरावरून जिल्हा नियोजन विभागामार्फत आदिवासी विकासासाठी खर्च केला जात असताना आदिवासी लोकप्रतिनिधी व लोकांना विश्वासात घेतले जात नाही असे दिसून आले

**संदर्भसूची:**


१) प्रा. डॉ. देशमुख सुदर्शन (२००७) : ‘आदिवासी समाजाचे दारिद्र्य’ निर्मल प्रकाशन,नांदेड.

२) कोडीतकर सुरेश (२००८): ‘आदिवासी जीवन कथा आणि व्यथा’ सुगावा प्रकाशन, पुणे.

३) घाटे निरंजन (२००९) : ‘आदिवासीनचे अनोखे विश्व’ मनोविकाश प्रकाशन, पुणे.

४) डॉ. मारोती तेगमपुरे (२००९) : ‘आदिवासी विकास आणि वास्तव’ चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

५) डॉ. गारे गोविंद (२०१३) : आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ’ सुगावा प्रकाशन, पुणे.

६) लोकराज्य (ऑगस्त २०१३) : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन,

७) डॉ. बी. एन. आकरे (२०१४) : ‘आदिवासींची ओळख’ पिंपळापुरे बुक डिस्ट्रिबुटर, नागपूर.

८) योजना (जानेवारी २०१४) ; विकास समर्पित मासिक, नियोजन आयोग,माहिती व प्रसारण मंत्रालय,मुंबई.

९) कोकाटे चंद्रकांत नामदेवराव (२००९) : ‘हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन’ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे पीएच. डी. पदविसाठी सादर केलेला शोध प्रबंध.

१०) शेकोबा परशुराम ढोले (२०१७) : ‘आदिवासी विकास योजनांचे मूल्यमापन : एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)’ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा, विद्यापीठ नांदेड, येथे पीएच. डी. पदविसाठी सादर केलेला शोध प्रबंध

# प्रकरण तिसरे

# हिंगोली जिल्ह्याची पार्श्वभूमी

**३.१ प्रस्तावना:**

परभणी जिल्ह्याचे विभाजन होऊन हिंगोली जिल्ह्याची निर्मिती एक जून १९९९ रोजी करण्यात आली. परभणी जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी, वसमत, सेनगाव आणि औंढा नागनाaथ या पाच तालुक्याचा हिंगोली जिल्हा निर्माण करण्यात आला. राष्ट्रसंत नामदेव यांची जन्मभूमी आणि बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग औंढा नागनाथ असलेला हिंगोली जिल्हा हा मराठवाड्यातील आठवा जिल्हा होय. या जिल्ह्याचे स्थान महाराष्ट्राच्या आग्नेय भागात येते. या जिल्ह्याच्या पूर्वेस यवतमाळ व नांदेड, दक्षिणेस नांदेड व परभणी आणि उत्तरेस बुलढाणा व वाशिम हे जिल्हे आहेत. प्राकृतिक रचनेवरून जिल्ह्याचे दोन भागात विभाजन करता येते.

१) **डोंगराळ प्रदेश -** सेनगाव हिंगोली औंढा कळमनुरी या प्रदेशाच्या उत्तर सीमेवरून पैनगंगा नदी वाहते.

२) **मैदानी प्रदेश-** दक्षिण भागातील हा प्रदेश वसमत तालुका व कळमनुरीच्या पूर्व भागात येतो. पूर्णा नदी व कयाधू नदीच्या खोऱ्यामुळे तो प्रदेश सुपीक बनलेला आहे.

हिंगोली जिल्ह्याचे क्षेत्रफळ ४५२६ चौ.कि.मी. असून जिल्ह्याची समुद्रसपाटीपासून सर्वसाधारण उंची ६०० चौ.मी. आहे. कयाधू ही जिल्ह्यातील प्रमुख नदी आहे. या नदीने वाहून आणलेल्या गाळामुळे जिल्ह्यातील नदीच्या काठाचा प्रदेश अत्यंत सुपीक बनलेला आहे. महाराष्ट्रातील शेती पावसावर अवलंबून आहे. यास हिंगोली जिल्हा अपवाद नाही. असे असले तरी हिंगोली जिल्हा हमखास पाऊस पडणारा जिल्हा आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. खरीप हंगामात ज्वारी, कापूस, मूग, सोयाबीन ही चार पिके प्रामुख्याने जिल्ह्यात घेतली जातात.

## ३.२ विकासाचे क्षेत्र-

हिंगोली जिल्ह्यात दुध व्यवसाय, फळे व भाजीपाला यांच्या उत्पादनात वाढ करण्याकरिता जिल्ह्यात मूलभूत साधनसामग्री मुबलक आहे. जिल्ह्यातील उपलब्ध असलेली जलसिंचन व्यवस्था त्या अनुषंगाने हिरव्या चाऱ्याची उपलब्धता तसेच खरीप व रब्बी या दोन्ही हंगामातील ज्वारीच्या पिकापासून विपुल गुरांचा चारा यामुळे दुग्ध व्यवसायाच्या विकासास चालना मिळत आहे. सहकारी संस्थेच्या माध्यमातून गती देण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे परंतु जवळपास मोठ्या प्रमाणावर आर्थिक लढाल होण्यासारखी मोठी बाजारपेठ नसल्याने फळे व भाजीपाल्याचे उत्पादन वाढीस खिळ बसली आहे म्हणून जिल्ह्यात फळे व भाजीपाला यावर प्रक्रिया करणारे कारखाने स्थापन करून फळे व भाजीपाल्याचे उत्पादन वाढविण्याकरिता जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

## ३.४ व्यवस्थापकीय विभाग-

हिंगोली जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ४५२६ चौरस किलोमीटर असून या जिल्ह्यात हिंगोली, कळमनुरी, वसमत, सेनगाव, औंढा नागनाथ या पाच तालुक्यांचा समावेश होतो. हिंगोली जिल्ह्यात दोन महसूल उपविभागापैकी हिंगोली या उपविभागात हिंगोली व सेनगाव यातील तहसीलचा समावेश होतो तर वसमत या उपविभागात वसमत व औंढा नागनाथ या दोन तहसीलचा समावेश होतो. जिल्ह्यात एकूण तीन नगरपरिषद आहेत. पैकी हिंगोली नगरपरिषद ‘ब’ वर्गीय तर बाकीच्या दोन नगरपरिषदा ‘क’ वर्गीय आहेत. जिल्ह्यात पाच तहसील मुख्यालयापैकी औंढा नागनाथ व सेनगाव या ठिकाणी नगरपरिषदा नाहीत. जिल्ह्यात औंढा नागनाथ या तहसील मुख्यालयाच्या ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समिती नाही. चार तहसील मुख्यालयाच्या ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समिती आहे.

**३.५ भौगोलिक वैशिष्ट्ये-**

हिंगोली जिल्ह्यात सेनगाव हिंगोली औंढा नागनाथ या तालुक्यात पर्वत टेकड्या सर्वत्र विसरलेल्या आहेत. तसेच वसमत तालुक्याचा उत्तरेकडील भागही पर्वत टेकड्यांनी वेढलेला आहे. या भागाची समुद्रसपाटीपासून उंची ५०० ते ६०० मीटर आहे. तर कळमनुरी तालुक्याचा पूर्वेकडील भाग वसमत तालुका मैदानी भागात मोडतो.

**३.६ नद्या-**

पैनगंगा ही हिंगोली जिल्ह्यातील प्रमुख नदी आहे. भौगोलिक दृष्ट्या तिचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. पैनगंगा नदी हिंगोली तहसील मधून पश्चिमेकडून पूर्वेकडे ती यवतमाळ जिल्ह्यात प्रवेश करून ती वर्धा नदीस मिळते. पूर्णा नदीवर औंढा नागनाथ तहसीलमध्ये सिद्धेश्वर येथे धरण बांधलेले आहे. तसेच सेनगाव तालुक्यातील येलदरी येथे धरण बांधण्यात आले आहे. वरील सर्व नद्या व धरणाच्या पाण्यामुळे हिंगोली जिल्हा सुजलाम सुफलाम झालेला आहे.

**३.७ हवामान-**

हिंगोली जिल्हा हा खात्रीचा पाऊस पडणाऱ्या प्रदेशात समाविष्ट आहे. अलीकडील काळात जून ते डिसेंबर या काळात नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून सरासरी ८८८.५ मि.मी. पाऊस पडतो. याशिवाय ऑक्टोबर व नोव्हेंबर अखेर पर्यंत ईशान्य मोसमी वाऱ्यापासून सर्वसाधारणपणे १०२ मिलिमीटर पाऊस पडतो. जिल्ह्याच्या सर्व भागात सारखा पाऊस पडत नाही पश्चिमेकडून पूर्वेकडे पावसाचे प्रमाण वाढत जाते.

**३.८ लोकसंख्या-**

सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या १.१२,३७४ हजार एवढी आहे तर हिंगोली जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ११,७७,३५४ असून त्यापैकी ६,०६२९४ पुरुष तर ५,७१,०५१ स्त्रिया आहेत. त्यांचे एकूण लोकसंख्येची टक्केवारी अनुक्रमे ५१.५० टक्के व ४८.५० टक्के एवढे आहे. २०११ च्या जनगणनेनुसार

जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी हिंगोली तालुक्यात २२.८९ टक्के, कळमनुरी तालुक्यात १९.६७ टक्के, वसमत तालुक्यात २४.७१ टक्के, सेनगव तालुक्यात १७.३४ टक्के, व औंढा नागनाथ तालुक्यात १५.३९ टक्के लोक राहतात. जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ८४.८१ टक्के लोकसंख्या खेड्यात वास्तव्य करते तर १५.१९ टक्के लोकसंख्या शहरात वास्तव्य करते. हिंगोली जिल्ह्याची लोकसंख्या विषयक माहिती तक्ता क्रमांक ३.१ मध्ये दर्शवण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ३.१**

**हिंगोली जिल्ह्याची लोकसंख्या (जनगणनावर्ष-२०११)**

| अ. क्र. | तपशील | हिंगोली जिल्हा लोकसंख्या (हजार) | महाराष्ट्र राज्य लोकसंख्या (हजार) |
|---|---|---|---|
| १ | एकूण | ११७७ | १,१२,३७४ |
| २ | ग्रामीण | ९९९ | ६१,५५६ |
| ३ | शहरी | १७९ | ५०,८१८ |
| ४ | पुरुष | ६०६ | ५८,२३४ |
| ६ | स्त्रिया | ५७१ | ५४,१३१ |

(संदर्भ– जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन -२०२२, जिल्हा हिंगोली. पा. क्र. ०९)

### ३.९ लोकसंख्येची घनता-

महाराष्ट्रातील लोकसंख्या आणि क्षेत्रफळाचा विचार करता २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येची घनता ३६५ प्रति चौ. कि. मी. एवढी दिसून येते तर जिल्ह्याचे क्षेत्रफळ आणि लोकसंख्येचा विचार करता जिल्ह्याची लोकसंख्येची घनता २४४ प्रति चौ. कि. मी. एवढी आहे. महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येच्या घनतेशी तुलना करता जिल्हा तसेच प्रत्येक तालुक्यात लोकसंख्येची घनता कमी असल्याचे दिसून येते.

## ३.१० स्त्री-पुरुष प्रमाण

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात दर हजार पुरुषांमागे ९४२ स्त्रिया असून महाराष्ट्र राज्या करीता हेच प्रमाण ९२९ एवढे दिसून येते. जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण हे राज्यातील स्त्री-पुरुष प्रमाणापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते.

## ३.११ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती-

**तक्ता क्र. ३.२**

**हिंगोली जिल्ह्यातील अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या**

**(जनगणना वर्ष-२०११)**

| अ. क्र. | बाब/ तालुका | मागासवर्गीय लोकसंख्या | | | | | | मागासवर्गीय लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनुसूचित जाती | | | अनुसूचित जमाती | | | | |
| | | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | सेनगाव | ३८३०४ | १९६७० | १८६३४ | १३६२३ | ७०२४ | ६५९९ | १८.७७ | ६.६७ |
| २ | हिंगोली | ४२३३५ | २१४७७ | २०८५८ | १६७४९ | ८६५५ | ८०९४ | १५.७१ | ६.२१ |
| ३ | औंढा ना. | २३६३० | १२०१३ | ११६१७ | २८४१३ | १४६१२ | १३८०१ | १३.०४ | १५.६८ |
| ४ | कळमनूरी | ३५९४९ | १८४८५ | १७४६४ | ४३५४१ | २२४२८ | २१११३ | १५.५१ | १८.८६ |
| ५ | वसमत | ४२३४७ | २१७३४ | २०६१३ | ९६२८ | ४९५५ | ४६७३ | १४.५६ | ३.३१ |
| **एकूण जिल्हा** | | **१८२५६५** | **९३३७९** | **८९१८६** | **१११९५४** | **५७६७४** | **५४२८०** | **१५.५२** | **९.५१** |

(संदर्भ -जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन -२०२२, जिल्हा हिंगोली पा. क्र. १८९)

तक्ता क्रमांक ३.२ व आलेख क्रमांक ३.१ वरुण असे दिसून येते की, हिंगोली जिल्ह्यात २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येपैकी जिल्ह्यात १८३ हजार (१५.५५ टक्के) अनुसूचित जातीचे तर ११२ हजार (९.५२ टक्के) लोक अनुसूचित जमातीचे आहेत. तालुक्यानुसार जाती जमातीचे प्रमाण अभ्यासले तर अनुसूचित जमातीचे प्रमाण कळमनूरी तालुक्यात सर्वाधिक १८.८ टक्के आहे. तर अनुसूचित जातीचे प्रमाण सेनगाव तालुक्यात सर्वाधिक १८.१७ टक्के आहे. जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती संदर्भातील माहिती पुढील प्रमाणेतक्ता क्रमांक ३.२ व आलेख क्रमांक ३.१ मध्ये दर्शवण्यात आली आहे.

**आलेख क्र. ३.१**

**हिंगोली जिल्ह्यातील अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या**

**(जनगणना वर्ष-२०११)**




## ३.१२ साक्षरता-

आलेख क्रमांक ३.२ वरुण असे दिसून येते की, सन २०११ च्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्यातील सात वर्ष वयोगटावरील एकूण १०.११ लक्ष लोकसंख्येच्या ७.९१ लक्ष (७८.१६ टक्के) लोक साक्षर आहेत. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात ७६.८१ टक्के तर नागरी भागात ८५.६५ टक्के लोक साक्षर आहेत. जिल्ह्यातील पुरुष आणि स्त्रिया यांच्या साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ८६.८१ टक्के व ६८.९५ टक्के आहे. तहसील निहाय साक्षरतेचे प्रमाण हिंगोली ८०.३२ टक्के, कळमनुरी ७८.५९ टक्के, वसमत ७७.६२ टक्के, सेनगाव ७७.७१ टक्के, औंढा नागनाथ ७५.७९ टक्के याप्रमाणे होते. जिल्ह्याच्या साक्षरते संदर्भात माहिती आलेख क्रमांक ३.२ मध्ये दर्शवण्यात आलेली आहे.

**आलेख क्र. ३.२**

**जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण**

**(जनगणना वर्ष २००१ आणि २०११)**




### ३.१३ पर्यटन / धार्मिक स्थळे

**१) औंढा नागनाथ -**

भारतातील बारा ज्योतिर्लिंग हे हिंदूंचे पवित्र तीर्थक्षेत्र आहेत. त्यातील पाच महाराष्ट्रात आहेत. शतकानुशतके या ठिकाणी शिवांची पूजा केली जाते. औंढा नागनाथ हे त्यापैकी एक आहे. औंढा नागनाथ हे हिंगोली जिल्ह्यात आहे. १२ ज्योतिर्लिंगांपैकी हा आठवा (आद्या) मानला जातो म्हणून या तीर्थयात्रा केंद्राला फार महत्व प्राप्त झाले आहे. असे मानले जाते की, धर्माराज (पांडवपैकी सर्वात मोठे) याने हेस्तिनापूरला १२ वर्षांपासून निर्वासित केले होते.



ज्योतिर्लिंग औंढा नागनाथ

नागनाथ मंदिराला उत्तम कोरीव काम आहे. मंदिर हेमाडपंती वास्तुशिल्प आहे. आणि सुमारे ६०,००० चौरस फूट क्षेत्रावर स्थित आहे. शिवरात्री आणि विजयादशमी च्या दिवशी मोठ्या संख्येने यात्रेकरू या मंदिरात येतात. मंदिरातील बांधकाम तेराव्या शतकातील असून देवगिरीच्या यादव काळातील आहे. मंदिर बांधकाम अभियांत्रिकी शाखेतील प्रशिद्ध हेमानडपंथी वस्तु शिल्पकलेनुसार अखंड दगडी खांबाच्या तसेच चुन्याशीवाय एकात एक बसविलेल्या दगडी चीऱ्यांचा उत्तमरित्या उपयोग करून बांधलेला आहे.

**२) नरसी नामदेव –**

हिंगोली तालुक्यातील नरसी नामदेव हे गाव हिंगोलीपासून १६ कि. मी. अंतरावर आहे. जिल्ह्यातील नरसी गावात संत श्री. नामदेव यांचा जन्मस्थळ आहे. संत नामदेव यांचा जन्म १२७० मध्ये झाला आणि त्याचे संपूर्ण नाव नामदेव दामाजी रेळेकर असे होते. नर्सी या गावाची लोकसंख्या सुमारे ८,००० एवढी आहे. हे ठिकाण हिंगोली आणि रिसोड या दरम्यान आहे. दरवर्षी संतची स्मरणशक्ती मध्ये एक सुंदर व्यवस्था असते.





श्री संत नामदेव महाराज

. राज्य सरकारने नरसी हे पवित्र स्थान आणि पर्यटन स्थळ म्हणून घोषित केले आहे. सरकारने नरसी येथील पर्यटनस्थळ बांधले आहे. पंजाब आणि उर्वरित भारतातील संत नामदेवचे अनेक अनुयायी आहेत जे नरसीला भेट देत असतात. तसेच काही शीख अनुयायी नरसी येथे गुरुद्वारा बांधलेले असल्याचे दिसून येते. आणि त्यांनी संत नामदेव यांचे स्मारक बांधण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिसते.

**३) डोंगरकडा –**

कळमनुरी तालुक्यातील डोंगरकडा कळमनुरी पासून २२.४ कि.मी. अंतरावर असून जटाशंकराच्या देउळासाठी हे गाव प्रसिद्ध आहे. मंदिराला चारही बाजूने संरक्षक भिंत असून उत्तरेकडे महाद्वार आहे. देवळाची बांधणी अतिशय मजबूत असून त्यात मोठा सभा मंडप आहे. दरवर्षी माघ वद्य १४ ला महाशिवरात्रीच्या दिवशी जटाशंकराची यात्रा

भरते. यात्रेला पंधरा ते वीस हजारावर भावीख मंडळी जमा होतात. शिवरात्रीत येथील अतिशय सुंदररीत्या कोरलेल्या पाच मजली लाकडी रथाची मिरवणूक काढली जाते.



जटाशंकर मूर्ती डोंगरकडा

**४) मल्लिनाथ दिगंबर जैन**



औंढा नागनाथ तालुक्यातील शिरड शहापूर या ठिकाणी जैन धर्मातील ऐतिहासिक मंदिरांपैकी एक मंदिर आहे. ३०० वर्षे जुने असलेले लॉर्ड मल्लिनाथ यांचे पुतळ देखील अस्तित्वात असल्याचे दिसून येते. या मंदिराच्या स्थापने बाबत एक कल्पित कथा प्रचलित आहे. काही वर्षांपूर्वी ही मूर्ती अर्धापूर या गावी ठेवन्यात आली होती. भट्टकर

श्री प्रीमानंद यांनी मूर्तीला करंजला स्थानांतरित करण्यासाठी निजामाची परवानगी मागितली. आणि निजामाने ती परवानगी दिली. श्री प्रीमानंद प्रवास करीत असतांना एकदा ते शिरड शाहपूरला थांबले. तिथे त्यांनी स्वप्नात पाहिले, ज्यामध्ये शिरड, शाहपूर येथे मूर्तिची स्थापना करण्यासाठी संदेश आला होता. म्हणून या ठिकाणी मंदिराची स्थापना करण्यात आली. अशा प्रकारे शिरड शहापूर येथे हे प्रसिद्ध मंदिराप्रमाणे अस्तित्वात आले आहे. आता हे ठिकाण पर्यटकांच्या सोयीसाठी विविध सोयी सुविधांनी बांधलेली आहे. संपूर्ण भारतातून बरेच जैन धर्मीय लोक या ठिकाणी यात्रेसाठी येतात.

**संदर्भ सूची**


१) डॉ. चंद्रकांत कोकाटे (२००८) : 'हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन' डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे पीएचडी पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंध.

२) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०२२) : अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन मुंबई, जिल्हा सांख्यिकी कार्यालय हिंगोली.

३) महाराष्ट्र वर्षीकी (२०१७) : माहिती व जनसंपर्क मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

४) हिंगोली जिल्हा, पर्यटन स्थळे, https://hingoli.nic.in/mr/

५) भारताची जनगणना (२०११) https://censusindia.net/

# प्रकरण चौथे

# आदिवासींसाठी असलेल्या शासकीय योजनांचा अभ्यास

## ४.१ प्रस्तावना:

भारताची औद्योगिक व वैज्ञानिक दृष्टिकोनातून होत असलेले प्रगती व विविध सुविधांची झालेली सोय या दृष्टिकोनातून विचार करता देशातील आदिवासी समाज अजूनही प्रारंभिक अवस्थेत जीवन जगत असल्याचे दिसते. आदिवासींच्या समस्या आणि इतर समाजाच्या समस्या यांच्यात वेगळेपणा असल्याचे दिसून येते. आदिवासींच्या समोर असणाऱ्या समस्यांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे आणि गंभीर स्वरूपाचे आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासींच्या विकासाबाबत फारसे प्रयत्न झाल्याचे दिसून येत नाही. वैयक्तिक पातळीवरून स्वतंत्ररित्या आदिवासींच्या विकासात मौलिक योगदान देणारे घटक म्हणून प्रामुख्याने भारतातील समाज सुधारक, आदिवासींचे कार्यकर्ते आणि ख्रिश्चन मिशनरी यांचा उल्लेख केला जातो. आदिवासींच्या संदर्भात सर्वकश व व्यापक तत्वावरील विकासाबाबतचे प्रयत्न स्वातंत्र्योत्तर काळात सुरू झाले. निसर्गाच्या सानिध्यात स्वच्छंदपणे जीवन जगणाऱ्या आदिवासींचा संपर्क प्रगत समाजाची आल्याने जंगल व जमिनीवर हक्कांवर गदा येऊन आदिवासींच्या समस्यांचा गुंता वाढत आहे. यास अनेक संशोधकांनी दुजोरा दिला आहे. परंपरागत जीवन, अंधश्रद्धा, निरक्षरता, व्यसनाधीनता, काही अनिष्ट प्रथा ही काही आदिवासींच्या मागासलेपणाचे लक्षणे असले तरी निसर्ग पूजा, निसर्ग ज्ञान, लोकसाहित्य व लोककला ही त्यांच्या सांस्कृतिक श्रीमंतीची वैशिष्ट्ये आहेत. सामाजिक, सांस्कृतिक वैशिष्ट्ये यांच्या आधारे आदिवासी समाज आपले वेगळेपणा टिकवून असून काळानुसार बदलही स्वीकारले जात आहेत. आदिवासींची अर्थव्यवस्था निर्वाह प्रधान असून शेती व शेतमजुरी, वनउपज संकलन, मोलमजुरी ही आदिवासींच्या उपजीविकेची प्रमुख साधने आहेत. भारताने प्रजासत्ताक गणराज्य पद्धतीचा केलेला स्वीकार, तसेच विकासासाठीचे नियोजन, समाजवादी समाज रचनेचे धोरण आणि आदिवासींना मिळालेले घटनात्मक अधिकार व संधी यामुळे आदिवासी विकास हे

सरकारचे दायित्व बनले. शोषणापासून संरक्षण आणि आर्थिक विकास असे आदिवासी विकासाचे दोन कलमी धोरण तयार करून यासाठी भारतीय राज्यघटनेत कलम २७५ (१) आणि कलम ३३२ (२) या द्वारे तरतूद करून ठेवली आहे.

दीर्घकाळ विकासापासून वंचित राहिलेल्या आदिवासी सारख्या विविध जाती जमातींचे प्रश्न सोडविणे हे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर चे फार मोठे आव्हान होते. अनेक वर्षापासून अन्याय अत्याचार सहन करीत असलेल्या दलित व आदिवासींच्या विकासासाठी घटनात्मक संरक्षण ही पूर्वअट बनली. भारत सरकारने पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून विकास प्रयत्नांना चालना देण्यास सुरुवात केली. आदिवासी विकास बाबतचे प्रयत्न ग्रामीण विकास अंतर्गत सुरू झाले. स्वातंत्र्योत्तर काळात जेव्हा सामुहिक विकास योजना ग्रामीण भागात राबविल्या जाऊ लागल्या तेव्हा आदिवासी भागांच्या विकासाचा प्रश्न निर्माण झाला. काही समाज सुधारकाने आदिवासींना आहेत तसेच राहू द्यावे त्यांना स्पर्शच करू नये अशी भूमिका घेतली तर काही समाज सुधारक उदाहरणार्थ इरावती कर्वे यांच्यामध्ये आदिवासी शक्य तितक्या जलद गतीने बाह्य जगाच्या संस्कृती प्रवाहात आणून सोडावे अशी दुसरी भूमिका घेतली.

### ४.२ अनुसूचित क्षेत्र (Schedule Area)

भारतीय संविधानाच्या दहाव्या खंडातील कलम ३४४ व २४४ 'अ' मध्ये अनुसूचित क्षेत्र व आदिवासी क्षेत्रांच्या व्यवस्थापनाची तरतूद करण्यात आली आहे. अनुसूचित क्षेत्र ही पाचव्या सूचीच्या तरतुदीनुसार चालविले जातात तर आदिवासी क्षेत्र ही सहाव्या सूचीच्या तरतुदीनुसार चालविले जातात. घटनेच्या पाचव्या सूचीच्या भागातील परिच्छेद सहा अन्वये राष्ट्रपती अध्यादेशाद्वारे जाहीर करतील त्या क्षेत्राला अनुसूचित क्षेत्र म्हणतात. राज्यपालांच्या सल्ल्यावरून राष्ट्रपती अशा क्षेत्रांमध्ये कोणतेही बदल करू शकतात. १९३५ च्या कायद्यानुसार अनुसूचित क्षेत्रांना वर्जीत क्षेत्र आणि अंशतः वर्जीत क्षेत्र घोषित करण्यात आले होते. घटनाकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की अनुसूचित क्षेत्र म्हणजे वर्जीत क्षेत्र आणि अंशतः वर्जीत क्षेत्राचे दुसरे नाव आहे. स्वातंत्र्यानंतर राष्ट्रपतीने अनुसूचित क्षेत्राबाबत दोन

अध्यादेश जाहीर केले. ते म्हणजे अ) अनुसूचित क्षेत्र (भाग अ राज्य) अध्यादेश, १९५० आणि ब) अनुसूचित क्षेत्र (भाग ब राज्य) अध्यादेश, १९५० (सुधारित).

### ४.३ आदिवासी विकास खंड (Tribal Development Block)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून सामूहिक विकास योजना व विस्तार कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली यासाठी जी नवीन संरचना निर्माण करण्यात आली त्यामध्ये विकास खंड /संवर्ग (Development Block) हा विकासाचा घटक होता. ग्रामीण विकासासोबतच आदिवासी भागातही ही योजना कार्यरत करण्यात आली. आदिवासींच्या विकासासाठी विशेष बहुउद्देशीय आदिम विकास खंड निर्माण करण्यात आले. सन १९५७ पर्यंत देशभरात असे एकूण ४३ विशेष बहुउद्देशीय अधिक विकास खंड निर्माण करण्यात आले. त्यावेळेस महाराष्ट्र राज्य नव्हते तर मुंबई राज्य अस्तित्वात होते. मुंबई राज्यात ७ विशेष बहुद्देशी आदिम विकास खंड निर्माण करण्यात आले. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर वरील सात पैकी चार विशेष बहुउद्देशी आदिम विकास खंड महाराष्ट्र राज्यात होते. त्यावेळी विदर्भात फक्त गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी या ठिकाणी विशेष बहुउद्देशीय अधिक विकास खंड होता. १९५९ मध्ये केंद्रीय गृह मंत्रालयाने डॉ. व्हेरियर एल्विन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली या समितीने वरील संरचनांच्या कार्याचा आढावा घेऊन आदिवासी विकास मंडळ स्थापन करण्याची शिफारस शासनाला केली या समितीच्या शिफारशीनुसार तिसऱ्या पंचवार्षिक योजना काळात भारतात एकूण २३८ आदिवासी विकास खंड निर्माण करण्यात आले. त्यामधील १८ आदिवासी विकास खंड महाराष्ट्रात होते. नंतर महाराष्ट्र राज्यात आदिवासी विकास खंड स्थापन करून आदिवासी विकास खंडाची संख्या ४० झाली.

### ४.४ आदिवासी उप-योजना (Tribal Sub Plan)

पाचव्या पंचवार्षिक योजना काळात नियोजन आयोगाने स्थापन केलेल्या आदिवासी क्षेत्र विकास कृती दल याद्वारे आदिवासींच्या स्थितीचा आढावा घेण्यात आला. आदिवासी समाजाच्या एकात्मिक विकासासाठी सुयोग्य प्रशासन नाही म्हणून

या कृती दलाने आदिवासी क्षेत्रांचा सामाजिक व आर्थिक विकास साधायचा असेल तर पाचव्या व त्यापुढील पंचवार्षिक योजनांसाठी एकात्मिक विकासाचे धोरण निश्चित केले पाहिजे अशी शिफारस केली. या शिफारशीनुसार १९७४-७५ मध्ये देशात आदिवासी उप-योजना तयार करण्यात आली. आदिवासींचे शोषण थांबवल्याशिवाय त्यांना कोणत्याही विकास योजनांचा लाभ मिळणार नाही. त्यासाठी एकात्मिक पतसेवा, शेतमाल व वनोपज यांची खरेदी, अवजारे व आवश्यक वस्तूंचा पुरवठा, उत्पादक कर्ज इत्यादींच्या परिणामकारक उत्तरदायित्वासाठी सुयोग्य उपायाची शिफारस या उप-योजनेत करण्यात आली. तसेच आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतरण रोखणे, वेठबिगारी सारख्या खूप प्रथा नष्ट करणे, वर्ण विषयक धोरणांचा आढावा घेणे यांचा देखील उप-योजनेत भर देण्यात आला. आदिवासी उपयोजना १७ राज्य व २ केंद्रशासित प्रदेशांमध्ये निवडक क्षेत्राला लागू करण्यात आली. आदिवासी बहुल चार राज्य अरुणाचल प्रदेश, मिझोराम, मेघालय व नागालँड आणि दोन केंद्रशासित प्रदेश लक्षद्वीप आणि दादर व नगर हवेली यांना संपूर्ण योजना ह्या आदिवासी विकास व कल्याणासाठीच असल्याने आदिवासी उप-योजना त्यांना लागू नाही.

### ४.५ आदिवासी व्यवहार मंत्रालय भारत सरकार (Tribal Affairs Ministry)

आदिवासींच्या सर्वकष सामाजिक व आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित करण्याच्या उद्देशाने भारत सरकार तर्फे ऑक्टोबर १९९९ मध्ये सामाजिक न्याय व अधिकार मंत्रालयाचे विभाजन करून स्वतंत्र आदिवासी व्यवहार मंत्रालय सुरू करण्यात आले. तेव्हा भारताचे पंतप्रधान माननीय श्री अटल बिहारी वाजपेयी हे होते. आदिवासींच्या विकासाबाबतचे धोरण ठरविणे व कार्यक्रम तयार करणे, त्यांचे आयोजन करणे व त्यात समन्वय राखणे याकरिता एक मध्यवर्ती मंत्रालय म्हणून कार्य पार पाडण्यासाठी आदिवासी व्यवहार मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. देशातील सर्व आदिवासी व आदिवासी जमाती असलेला भाग हे आदिवासी व्यवहार मंत्रालयाचे कार्यक्षेत्र आहे. या मंत्रालया अंतर्गत पुढील बाबींचा समावेश होतो.

१) आदिवासींना सामाजिक सुरक्षा व विमा प्रदान करणे

२) आदिवासी कल्याणच्या योजना तयार करणे, सांख्यिकीय माहिती ठेवणे, संशोधन मूल्यांकन व प्रशिक्षण देणे
३) आदिवासींच्या विकासासाठी स्वयंसेवी संस्था व व्यक्ती यांनी केलेल्या प्रश्नांची संवर्धन करणे व विकास घडवून आणणे
४) देशातील विविध आदिवासी जमातींचा विकास साधने
५) राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगासबंदीचे कार्य पार पाडणे

## ४.६ आदिवासी वन हक्क कायदा

जंगलामध्ये वास्तव्य करणाऱ्या भारतातील आदिवासी जमाती आणि इतर पारंपारिक वनवासी यांना त्यांचे वन हक्क आणि जंगलातील जमिनीवर व्यवसायाचा हक्क मान्य करण्यासाठी भारतात अनुसूचित जमाती आणि इतर पारंपारिक वनवासी अधिनियम २००६ तयार करण्यात आला. हा कायदा ३१ डिसेंबर २००७ पासून कार्यरत झाला. या कायद्यातील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी १ जानेवारी २००८ रोजी अधिसूचित करण्यात आले. या कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी एक नोडल ऑफिसर नियुक्त करण्याची सर्व राज्यांना विनंती करण्यात आली.

## ४.७ राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त विकास महामंडळ (National Scheduled Tribe Finance Corporation)

राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती वित्तीय विकास महामंडळाचे विभाजन करून एप्रिल २००१ मध्ये आदिवासी व्यवहार मंत्रालयामार्फत राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. भारतीय कंपनी कायदा विभाग २५ नुसार या महामंडळाला परवानगी देण्यात आली आहे. या महामंडळाच्या अधिकारानुसार ज्या आदिवासी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न दारिद्र्यरेषेच्या उत्पन्नाच्या दुप्पट आहे त्यांना आर्थिक मदत करण्यात येते. लक्ष गटाच्या कौशल्य व उद्योजकीय विकासासाठी अनुदानाच्या स्वरूपात आर्थिक सहाय्यक महामंडळ करीत असते. जंगलातील लघु स्वरूपातील उत्पादनासाठी व विपणनासाठी मदत केली जाते. पात्र

आदिवासी कुटुंबाच्या उत्पन्नाचा स्तर उंचावणे आणि सामाजिक आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणणे या उद्देशाने महामंडळाकडून वित्तीय मदत केल्या जाते.

### ४.८ महाराष्ट्र राज्यातील आदिवासी विकास कार्यक्रम

भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार राज्यातील सर्व दुर्बल घटक विशेषतः अनुसूचित जाती-जमाती लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी विशेष काळजी घ्यावी आणि त्यांचे सामाजिक न्याय व इतर पिळवणुकीपासून संरक्षण व्हावे ही जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. भारतीय संविधानातील या मार्गदर्शक तत्वाला अनुसरून मागासवर्गीय यांच्या सामाजिक आर्थिक व शैक्षणिक सुधारणांच्या कार्यक्रमावर भर देण्यात येत आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात आदिवासी विकास विभागामार्फत विविध आदिवासी विकास योजना राबविल्या जात आहेत.

### ४.९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (Integrated Tribal Development Project)


भारत सरकारच्या निर्देशानुसार २९७५-७६ मध्ये ज्या गावामधील आदिवासींची संख्या एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के पेक्षा अधिक आहे अशा गावांचा समावेश एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये करण्यात आला. त्यावेळी भारत सरकारने मान्यता दिलेले महाराष्ट्र राज्यातील एकूण १६ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प होते. नंतर ज्या गावातील आदिवासींची लोकसंख्या ५० % पेक्षा किंचित कमी होती त्या गावांचा समावेश एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये करण्यात आला. अशी क्षेत्रे अतिरिक्त आदिवासी उपयोजना म्हणून ओळखण्यात येऊ लागले. महाराष्ट्र सरकारची मान्यता मिळालेली अशी ४ अतिरिक्तआदिवासी उपयोजना प्रकल्प होती. सध्या राज्यात एकूण २४ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यरत आहेत.

### ४.१० महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ (Maharashtra State Co-operative Tribal Development Corporation)

आदिवासींच्या विकासाचा एक भाग म्हणून महाराष्ट्र सरकारने १९७२ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. या

महामंडळाची स्थापना महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा १९६० नुसार करण्यात आली आहे. या महामंडळाचे मुख्य कार्यालय नाशिक येथे असून महामंडळातर्फे राज्यातील एकूण ७५ तालुक्यांमध्ये शाखा स्थापन करण्यात आल्या आहेत. आदिवासींना वित्त पुरवठा करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या सहकारी संस्था या महामंडळाशी संलग्न करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र सरकारने राज्यात २५८ आदिवासी सहकारी संस्था निर्माण केले असून आदिवासी विकास महामंडळ तर्फे होणाऱ्या खरेदी विक्री कार्यामध्ये या संस्था समन्वय साधू लागल्या आहेत.

### ४.११ आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र शासन




महाराष्ट्र राज्यात समाज कल्याण विभागामार्फत आदिवासी कल्याण विभाग १९७२ पर्यंत चालविल्या जात होता. सण १९७३ मध्ये समाज कल्याण विभागामधून

आदिवासी कल्याण विभाग वेगळा करण्यात आला. नंतर काही काळ स्वतंत्र आदिवासी विभागाचे निर्मिती होईपर्यंत समाज कल्याण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आदिवासी कल्याण विभागाचे कार्य चालू होते. महाराष्ट्राच्या दुर्गम, दर्या-खोऱ्यातला, डोंगराळ भागात वास्तव्य करणाऱ्या आदिवासींच्या कल्याणासाठी १ मे १९८३ मध्ये महाराष्ट्राच्या मंत्रालयात 'आदिवासी विकास विभाग' या नावाने स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात आली. या विभागाअंतर्गत आदिवासी विकासासाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा निर्माण झाली. आदिवासींचा सामाजिक. आर्थिक व शैक्षणिक विकास व्हावा या उद्देशाने आदिवासी विकास विभागाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच अति दुर्गम भागातील अडाणी आदिवासींना मुख्य प्रवाहात आणून त्यांच्यापर्यंत शासनाच्या विविध योजनांचा लाभ पोहोचविणे हा देखील त्यामागे उद्देश होता.

### ४.१२ केंद्र सरकार पुरस्कृत राज्यातील आदिवासी विकास योजना

केंद्र सरकारकडून आदिवासींचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी आदिवासी व्यवहार मंत्रालय मार्फत अनेक योजना राबवल्या जात आहेत त्यापैकी काही योजनांचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

### १) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७६(१) अंतर्गत योजना व विशेष केंद्रीय सहाय्य योजना

महाराष्ट्र राज्यातील बहुतांशी आदिवासी लोक अती दुर्गम भागात वास्तव्य करतात. त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी त्यांच्या करिता रोजगार निर्मिती, उत्पन्न वाढीच्या योजना, वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या योजना तसेच क्षेत्र विकासाच्या योजना राबविणे आवश्यक आहे. त्यासाठी आदिवासी उप-योजनेच्या निधीस पूरक निधी म्हणून केंद्र शासनाच्या निधीतून विशेष केंद्र सहाय्य अंतर्गत निधी प्राप्त होतो. या

निधीतून प्रामुख्याने वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या योजना राबवल्या जातात त्याचप्रमाणे मूलभूत सोयी सुविधा व क्षेत्र विकासाच्या योजना राबवल्या जातात.

### २) एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या आदर्श निवासी शाळा

अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी मधून शिक्षण मिळावे यासाठी इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा ही केंद्र पुरस्कृत योजना राबवली जाते. अशा शाळेत इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंत चे शिक्षण देण्यात येते. ११ सप्टेंबर २००० नुसार भारतीय संविधानाच्या कलम २७५(१) अन्वये वितरित होणाऱ्या निधीमधून ९ आदर्श निवासी शाळा महाराष्ट्र सरकारला मंजूर केल्या असून त्यापैकी ८ एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा सन २०००-२००१ पासून सुरू आहेत.

### ३) केंद्रीय क्षेत्र योजनेअंतर्गत आदिम जमाती विकास योजना

भारतात एकूण ७६ अतिमागास (आदिम) जमाती आहेत. त्यापैकी महाराष्ट्र राज्यात ३ आदिम जमाती वास्तव्य करतात. आदिम जमाती संख्येने कमी आहेत. त्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती अत्यंत कमकुवत असते. आदिम जमाती अतिदुर्ग भागात वास्तव्यास असल्यामुळे त्या ठिकाणी संपर्काचे साधने व इतर सोयी सुविधांचा अभाव मोठ्या प्रमाणात असतो. अशा परिस्थितीत त्यांना जीवनावश्यक सुविधा पुरविणे, त्यांच्या संस्कृतीचे रक्षण करणे, त्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता प्रयत्न करणे आणि त्यांना समाजाच्या मूख्य प्रवाहात आणण्यासाठी आरोग्य, घरकुल, शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्य विकास, संस्कृती, पिण्याचे पाणी, उत्पादन, रोजगार,आर्थिक उत्पन्न निर्माण योजना इत्यादी योजना आदिम जमातींचे संरक्षण व विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्याचे धोरण केंद्र व राज्य सरकारने आहे.

### ४) भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना

आदिवासी विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर उच्च शिक्षणाकरिता प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने व त्यांना उच्च शिक्षणाचा खर्च भागवता यावा याकरिता भारत सरकार द्वारा शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना राबवल्या जात आहे.

### ५) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना

आदिवासी समाजातील लोकांसाठी स्थानिक गरजा वर आधारित लहान अभ्यासक्रम राबवून त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, अत्यंत गरजेचे यंत्र व अवजारे स्थानिक पातळीवर दुरुस्त करून घेण्यासाठी कुशल कारागीर उपलब्ध करून देणे या उद्देशाने व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना राज्य सरकार तर्फे सुरू करण्यात आली आहे. राज्यात एकूण १५ व्यवसाय प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आलेले असून त्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षण कालावधी हा ४ महिन्याचा असतो. प्रशिक्षण केंद्रात एका सत्रात ५० विद्यार्थ्यांना प्रवास दिला जातो.

### ६) आश्रम शाळा समूह योजना

अती दुर्गम व डोंगराळ भागात वास्तव्य करणाऱ्या आदिवासींच्या सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रगतीसाठी महाराष्ट्र सरकारतर्फे आश्रम शाळा योजना राबविल्या जात आहे. आश्रम शाळा समूह योजनेत वस्तीगृहास प्राथमिक शाळांचा समावेश आहे. आश्रम शाळेला जोडून असलेल्या वस्तीगृहात राहणाऱ्या मुलांसाठी दोन वेळचे जेवण, दोन गणवेश, राहण्याची सोय व इतर शैक्षणिक साहित्य मोफत दिली जातात.

### ७) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य पुणे

महाराष्ट्र राज्यातील पुणे येथे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आली आहे या संस्थेमार्फत आदिवासींच्या उन्नतीसाठी केंद्र व राज्य सरकार पुरस्कृत विविध प्रकल्प हाती घेतल्या जातात. ते पुढील प्रमाणे

- आदिवासी संस्कृती, कला व जीवनावर आधारित लघुपट निर्मिती
- आदिवासी सांस्कृतिक महोत्सव
- ग्रंथालय
- प्रकाशने
- संशोधन

- अधि छात्रवृत्ति
- प्रशिक्षण

### ८) शबरी महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या स्वयंरोजगार योजना

राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ संस्कृत मुदत कर्ज योजना आणि राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ तर्फे महिला सशक्तिकरण योजना या योजना राबविल्या जातात.

### ९) प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण ही केंद्र सरकार योजना असून या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील घरे नसलेल्या कच्च्या घरात राहणाऱ्या लोकांना मूलभूत सुविधांसह पक्की घरे मूलभूत सोयी सुविधासह बांधून देण्यात येतात. घरकुल बांधकामाकरिता साधारण क्षेत्रात रुपये १.२० लाख तर नक्षलक्षत्र क्षेत्रासाठी रुपये १.३० लाख प्रति लाभार्थी अर्थसाह्य देण्यात येते.

### १०) एकात्मिक बाल विकास सेवा योजना

एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र सरकार पुरस्कृत योजना असून समाज कल्याण महिला व बालकल्याण समिती मार्फत राबविला जाते. या योजनेअंतर्गत शुन्य ते सहा वर्षे वयोगटातील मुले, गरोदर स्त्रिया, व स्तनदा माता यांना विविध सुविधा पुरविण्यात येतात.

### ४.१३ राज्य सरकार पुरस्कृत आदिवासी विकास योजना

महाराष्ट्रातील दुर्गम व डोंगराळ भागातील आदिवासींच्या कल्याणासाठी सन १९८३ मध्ये स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची निर्मिती महाराष्ट्र शासनाने केली आहे. आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास व्हावा यासाठी हा विभाग सतत कार्यरत आहे. या विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या व इतर

विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या आदिवासी कल्याणच्या योजनांचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

### १) केंद्रवर्ती अर्थसंकल्प (नुक्लिअस बजेट) योजना

आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीने सुयोग्य अशा विविध कार्यक्रमांना स्थानिक पातळीवर मंजुरी देऊन त्वरित कार्यान्वित करता यावेत या उद्देशाने केंद्रवर्ती अर्थसंकल्प ही योजना राज्य सरकारने १९८१-८२ पासून सुरू केली. स्थानिक महत्त्वाच्या कर्ज विरहित योजना यांचा समावेश अर्थसंकल्पात नाही, अशा योजना त्वरित व प्रभावीपणे राबवून आदिवासींना प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. आदिवासींच्या गरजा व उपलब्ध साधनसामग्रीचा विचार करून प्रकल्प अधिकारी अशा योजना तयार करतात उदाहरणार्थ तेंदु पत्ता गोळा करणे, बांबूपासून कलाकृतीच्या वस्तू तयार करणे, कापड यंत्र देणे, पत्रावळी तयार करणे इत्यादी योजनांचा समावेश होतो.

### २) ठक्कर बाप्पा वस्ती सुधार योजना

ठक्कर बाप्पा वस्ती सुधार योजनेअंतर्गत ग्रामीण व नागरी भागातील अनुसूचित आदिवासी क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी क्षेत्र, पाडा क्षेत्र, मिनी पाडा क्षेत्र तसेच आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रातील ५० टक्के पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेल्या वस्त्या, पाडे, वाड्या, गावे, महानगरपालिका, नगरपरिषदेचे प्रभाग या क्षेत्रात विकासासाठी आवश्यक असणाऱ्या सुधारणा करण्यात येतात.

### ३) शबरी आदिवासी घरकुल योजना

आदिवासी बांधव हा अति दुर्गम भागात, मातीच्या घरात राहतो. आदिवासी बांधवांना हक्काची व कायमस्वरूपी पक्की स्लॅबची घरे बांधून घेऊन त्यांना शौचालयाची व स्नानगृहाची सुविधा उपलब्ध व्हावी या उद्देशाने शबरी आदिवासी घरकुल योजना राबविल्या जाते. या योजनेमार्फत पात्र लाभार्थ्यांना २६९ चौरस फूट चटई क्षेत्र असलेले पक्के घर बांधून देण्यात येते.

### ४) वन विषयक योजना

आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक विकासात वनविषयक कामे अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत असतात. यात प्रामुख्याने मुख्य व गौण वन उत्पादन घेणे यांचा समावेश होतो. तसेच वनीकरण व रोपांची लागवड, वन्य पशुजीवन, निसर्ग संवर्धन इत्यादी कामांचा समावेश होतो. उपलब्ध असलेल्या वनोउत्पादनाबाबत वन विभाग, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ इत्यादी मार्फत उपलब्ध होणाऱ्या रोजगारावर आदिवासींचे आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होते.

### ५) आदिवासी युवकांसाठी फलोत्पादन योजना

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी बेरोजगार युवकांना स्वयंरोजगार प्राप्त व्हावा या हेतूने सरकारतर्फे आदिवासी युवकांसाठी फलोत्पादन योजना राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत युवकांना फळ लागवडी बाबतचे सामान्य ज्ञान, रोप संरक्षण, कलमीकरण करणे, बागांची निगा राखणे इत्यादी बाबतचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या प्रशिक्षणार्थी युवकांना दररोज प्रशिक्षण भत्ता तसेच प्रशिक्षण कालावधीत राहण्याची मोफत सोय उपलब्ध करून दिल्या जाते.

### ६) फळझाडे व भाजीपाला लागवड योजना

राज्यातील बारा जिल्ह्यांतील आदिवासी भागात उपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते. या भागातील आदिवासींच्या दररोजच्या आहारातील फळे व भाजीपाला यांचे प्रमाण अत्यंत असल्यामुळे कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे. या परिसरातील आदिवासी कुटुंबाचे आहारात जीवनसत्वे व इतर आवश्यक पोषणद्रव्ये उपलब्ध व्हावे यासाठी शासनातर्फे पौष्टिक आहार योजना सुरू केली आहे. आदिवासींच्या परसबागेत फळे व भाजीपाला पिकांची लागवड करण्याची योजना १९९८-९९ या वर्षापासून अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरा करिता सरकारने मंजूर केली.

### ७) शासकीय आश्रम शाळा समूह योजना

अति दुर्गम डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासी लोकांचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास जलद गतीने घडून आणण्यासाठी सन १९७३-७३ पासून सरकारने निवासी आश्रम शाळा समूह योजना कार्यान्वित केलेली आहे. शिक्षणाची ज्ञानगंगा दर्या खोऱ्यात व दुर्गम पाड्यात पोहोचविण्याचे काम शासकीय आश्रम शाळा मार्फत होत आहे. या योजनेत आदिवासी मुलांची दहावीपर्यंतच्या शिक्षणाची मोफत सोय करण्यात येते. या योजनेनुसार विद्यार्थ्यांना निवासाची सोय, भोजनाची सोय, आंथरून पांघरून, गणवेश, पुस्तके व इतर लेखन साहित्याचा पुरवठा मोफत करण्यात येतो.

### ८) अनुदानित आश्रम शाळा योजना

आदिवासी बांधवांच्या शैक्षणिक प्रगती सुधारणा घडवून आणण्यासाठी खाजगी संस्थांना अनुदान तत्त्वावर आश्रम शाळा चालवण्याची परवानगी महाराष्ट्र सरकार तर्फे देण्यात आली आहे. अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना निवासाची सोय, अंथरुण पांघरून, गणवेश, पुस्तके व इतर लेखन साहित्य इत्यादी साहित्य पुरवण्यासाठी सरकारतर्फे एका विद्यार्थ्याच्या मागे सहाशे तीस रुपये याप्रमाणे खाजगी संस्थांना अनुदान देण्यात येते.

### ९) विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता योजना

आर्थिक परिस्थिती कमकुवत असणाऱ्या तसेच इतर कोणत्याही आर्थिक सवलती शिवाय व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी निर्वाह भत्ता योजना सुरू करण्यात आली आहे. अशा विद्यार्थ्यांना लागणाऱ्या अधिकच्या खर्चाची मदत व्हावी म्हणून निर्वाह भत्ता देण्यात येतो. चार ते पाच वर्षाच्या अभ्यासक्रमाकरिता वस्तीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा सातशे रुपये तर व वस्तीगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना एक हजार रुपये निर्वाह भत्ता देण्यात येतो.

**१०) विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांकरीता बक्षीस योजना**

आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे,यांच्यामध्ये गुणवत्तेबाबत आवड निर्माण व्हावी या उद्देशाने विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांकरिता बक्षीस योजना राज्यात राबविण्यात येत आहे. शालांत व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस दिले जाते.

**११) परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना**

परदेशात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या आदिवासींच्या दहा विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना राज्यात सन २०१४-१५ या वर्षापासून मंजूर करण्यात आली आहे. या शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र ठरणाऱ्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा जास्तीत जास्त सहा लाख रुपये पर्यंत ठरवण्यात आली. या योजनेमार्फत वैद्यकीय अभ्यासक्र, इंजीनियरिंग, विज्ञान, कृषी व इतर विषयाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

**१२) सेवा योजना नाव नोंदणी योजना**

सुशिक्षित बेरोजगार असणाऱ्या आदिवासी समाजातील उमेदवारांची नाव नोंदणी सेवा योजना कार्यालयात करण्यात येत होती. परंतु या उमेदवारांना रोजगाराची संधी मिळण्यास फार उशीर लागत होता म्हणून राज्य सरकारने आदिवासी प्रकल्प कार्यालयात नाव नोंदणीचे कार्य सुरू केले. या योजनेअंतर्गत गरजे व सुशिक्षित आदिवासी समाजातील बेरोजगार उमेदवारांची नावे नोंदविल्या जातात. नाव नोंदणी झालेल्या उमेदवारांची नावे विविध नोकर भरतीसाठी संबंधित अधिकाऱ्याकडे शिफारस करून पाठविले जाते.

## १३) पी. व्ही. सी. पाईप योजना

आदिवासी समाजातील शेतकऱ्यांचा आर्थिक दर्जा उंचावण्याकरिता शंभर टक्के अनुदानावर वीज पंप व तेल पंप योजनेचा लाभ घेतलेल्या आदिवासी समाजातील शेतकऱ्यांना पी. व्ही. सी. / एच. डी. पी. पाईप पुरवठा केला जातो. या योजनेमुळे आदिवासी समाजातील शेतकऱ्यांच्या सिंचनाखालील क्षेत्रात वाढ होण्यास मदत होते.

## १४) आदिवासी उप-योजना अंतर्गत इतर विभागाच्या योजना

### अ) पिक संवर्धन

आदिवासी शेतकरी कुटुंबना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यासाठी अर्थसहाय्य देण्याची योजना कृषी विभागामार्फत आदिवासी उपयोजने खाली, आदिवासी योजना बाहेरील व माडा क्षेत्रात राबविण्यात येते. प्रामुख्याने आदिवासी उपयोजने खालील १६. जिल्ह्यात ही योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत आदिवासी कुटुंबांना जमीन विकास कामे, सुधारित शेती अवजारे, बैल जोडीचा पुरवठा, शेततळे, परसबाग, पंपसंच, पाईपलाईन इत्यादी बाबीसाठी अर्थसहाय्य देण्यात येते.

### ब) फलोत्पादन

फलोत्पादन हा कृषी क्षेत्राशी संलग्न असलेला आदिवासीसाठी उत्पन्नदायी ठरणारा महत्त्वाचा कार्यक्रम आहे. यामध्ये फलोत्पादन, रोग संरक्षण, बागायती रोपमळ्यांची स्थापना /बळकटीकरण या कार्यक्रमांमध्ये लहान व श्रीमंत आदिवासी शेतकऱ्यांना शंभर टक्के अनुदान देण्यात येते.

### क) पशुसंवर्धन

आदिवासींच्या आर्थिक स्थितीमध्ये वाढ होण्यास मदत होईल या उद्देशाने पशुसंवर्धन या कार्यक्रमात विविध योजना हाती घेण्यात येतात. आदिवासींच्या दृष्टीने पशुसंवर्धन हा कार्यक्रम शेतीला पूरक व्यवसाय म्हणून अतिशय महत्त्वाचा आहे. पशुसंवर्धन कार्यक्रमांतर्गत पशुवैद्यकीय केंद्र ची स्थापना करणे, पशुवैद्यकीय दवाखाने,

पशु विकास, दुभत्या जनावरांना खाद्य पुरवठा करणे, इत्यादी अशा विकास योजना राबवल्या जातात.

**ड) मत्स्य व्यवसाय**

आदिवासी क्षेत्रामध्ये विशेषतः किनारा नसलेल्या जिल्ह्यामध्ये आदिवासी लोकांचा मच्छीमार व्यवसाय हा अर्धवेळ असून त्यावर काही प्रमाणात त्यांचा उदरनिर्वाह चालत आलेला आहे. नवीन पद्धतीचा अवलंब करून आदिवासींच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी मत्स्य व्यवसाय विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. मत्स्यबीज उत्पादन, अवरुद्ध पाण्यात मत्स्यसंवर्धन, मच्छिमार सहकारी संस्था विकास, मासेमारी साधनांच्या खरेदीसाठी अर्थसहाय्य, मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा स्थापन करणे इत्यादी योजना राबविल्या जातात.

## ४.१४ आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, कार्यक्रम अंदाजपत्रक

आदिवासी क्षेत्राचा व या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास घडवून येण्यासाठी केंद्र शासनाने केलेल्या सूचना व मार्गदर्शक तत्वे यानुसार महाराष्ट्र सरकारने आदिवासींसाठी एक स्वतंत्र जनजाती क्षेत्र उपयोजना सन १९७५-७६ मध्ये तयार केली व १ एप्रिल १९७६ पासून त्याची अंमलबजावणी करण्यात आली. या आदिवासी उपयोजनेमध्ये महाराष्ट्रातील १७ जिल्ह्यातील ६८ तालुक्यांमध्ये ६९६२ गावे व १२ शहरे यांचा समावेश करण्यात आला आहे. १९९३-९४ पासून महाराष्ट्र राज्यात वार्षिक आदिवासी उपयोजना स्वतंत्रपणे तयार करण्यात येत आहे.

**अ) आदिवासी उपयोजनेसाठी नियतव्यय**

राज्यातील आदिवासी उपयोजनासाठी आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी करण्यात आलेली अर्थसंकल्पीय तरतूद खालील तक्ता क्रमांक ४.१ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

तक्ता क्रमांक ४.१ वरून असे दिसून येते की आदिवासी घटक कार्यक्रम अंतर्गत नियोजन विभागाने ११११९.०० कोटी रुपये नियतव्य उपलब्ध करून दिला आहे. या नियतव्यमधून जिल्हा वार्षिक आदिवासी उप योजनेसाठी २१०६.७६४९ कोटी रुपये तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली असून राज्यस्तरीय आदिवासी उपयोजनेसाठी ९०९२.२३५१ कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे.

### तक्ता क्रमांक ४.१

### आदिवासी उपयोजना अर्थसंकल्पीय तरतूद( कोटी रू.)

**(आर्थिक वर्ष २०२२-२३)**

| अनुक्रमांक | खर्चाचे प्रकार | | | तरतूद |
|---|---|---|---|---|
| १. | अनिवार्य खर्च ... ... ... ... ... | | | १८८.०७१६ |
| २. | कार्यक्रमांवरील खर्च— | | | |
| | (अ) जिल्हा योजना ... ... ... ... | | २१०६.७६४९ | |
| | (ब) आदिवासी विकास विभाग— ... ... ... | | ७०२९.८५५५ | |
| | आस्थापना खर्च ... ... | रु. २५०१.७१७४ कोटी | | |
| | शैक्षणिक बांधील खर्च ... | रु. २०११.०००८ कोटी | | |
| | इतर विकास योजना ... | रु. २५१७.१३७३ कोटी | | |
| | (क) इतर प्रशासकीय विभाग— ... ... ... | | २०६२.३७९६ | |
| | आस्थापना खर्च ... | रु. १०५.२२९७ कोटी | | |
| | केंद्र योजनांना समरुप राज्य हिस्सा... | रु. ९२९.५४२३ कोटी | | |
| | इतर राज्य योजना ... | रु. १०२७.६०७६ कोटी | | |
| | | | (अ+ब+क) ... | ११११९.०००० |
| | केंद्र पुरस्कृत योजना ... ... ... ... ... (केंद्र हिश्श्याकरिता Shadow तरतूद) | | | ३५६२.७५९२ |
| | | | एकूण कार्यक्रम ... | १४७६१.७५९२ |
| | | | एकूण आदिवासी विकास (१+२) ... | १४९४९.८३०८ |

(संदर्भ – कार्यक्रम अंदाजपत्रक २०२२-२३, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन पा. क्र. २)

राज्यस्तरीय योजनेअंतर्गत आदिवासी विकास विभागाकरिता ७०२९.८५५ कोटी रुपये तर इतर प्रशासकीय विभागाकरिता २०६२.३७९६ कोटी रुपये तरतूद करण्यात आले आहे. केंद्र पुरस्कृत योजनांच्या केंद्र हिश्याकरिता ३५६२.७५९२ कोटी रुपये एवढी तरतूद अर्थसंकल्पीत केली आहे. यामध्ये आदिवासी विकास विभागासाठी ८८०.०००१ कोटी रुपये तर प्रशासकीय विभागासाठी २६८२.७५९१ कोटी रुपये एवढी तरतूद करण्यात आली आहे.

वरील प्रमाणे आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी एकूण १४७६१.७५९२ कोटी रुपयाची तरतूद अर्थसंकलित करण्यात आली आहे.

**ब) आदिवासी उपयोजनेसाठी विशेष केंद्रीय सहाय्य**

आदिवासी भागाच्या पायाभूत विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांना पूरक निधी म्हणून केंद्र सरकारकडून दरवर्षी महाराष्ट्र सरकारला विशेष केंद्रीय अर्थसहाय्य प्राप्त होते. दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीपासून केंद्र सरकारकडून महाराष्ट्र सरकारला मिळालेले विशेष केंद्रीय अर्थसहाय्य व झालेला खर्च पुढील तक्ता क्रमांक ४.२ मध्ये दर्शविलेला आहे.

तक्ता क्रमांक ४.२ वरून असे लक्षात येते की, आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१७-१८ पर्यंत दर वर्षी मंजूर झालेल्या निधी पैकी प्रत्यक्षात झालेला खर्च १०० टक्के असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्रमांक ४.२**

**आदिवासी उपयोजनेसाठी विशेष केंद्रीय सहाय्य (लाख रु.)**

**(आर्थिक वर्ष २०२२-२३)**

| वर्ष | मंजूर रक्कम | खर्च झालेली रक्कम |
|---|---|---|
| २०१३-२०१४ | ७७२८.०० | ७७२८.०० |
| २०१४-२०१५ | ११७२६.१८ | ११७२६.१८ |
| २०१५-२०१६ | १२५१४.९१ | १२५१४.९१ |
| २०१६-२०१७ | ९५४७.०० | ९५४७.०० |
| २०१७-२०१८ | १३७६०.३८ | १३७६०.३८ |
| २०१८-२०१९ | १३८०२.५७ | ६४९१.२३ (प्रत्यक्ष खर्च) |
| २०१९-२०२० | ११९२९.७९ | ४२६८.२४ (प्रत्यक्ष खर्च) |
| २०२०-२०२१ | -- | -- |
| २०२१-२०२२ | -- | -- |

(संदर्भ – कार्यक्रम अंदाजपत्रक २०२२-२३, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन पा. क्र. २)

आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये मंजूर रक्कम १३८०२..५७ लाख रुपये एवढी असून प्रत्यक्षात झालेल्या खर्च ६४९१.२३ लाख रुपये एवढा म्हणजे खर्चाचे प्रमाण ४७

टक्के आहे. तर आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये मंजूर रक्कम ११९२९.७९ लाख रुपये एवढी असून प्रत्यक्षात झालेला खर्च ४२६८.२४ लाख रुपये एवढा म्हणजे खर्चाचे प्रमाण २१ टक्के आहे.

### क) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) नुसार प्राप्त निधी

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) मधील तरतुदीनुसार दरवर्षी केंद्र सरकारकडून आदिवासी विकास विभागाला विशेष निधी प्राप्त होते. आणि तो आदिवासी क्षेत्राच्या पायाभूत विकासासाठी विविध योजनांवर खर्च करण्यात येतो. केंद्र सरकारकडून दहाव्या पंचवार्षिक योजने पासून महाराष्ट्र सरकारला वेळोवेळी प्राप्त झालेल्या केंद्रीय निधीतून खालील तक्ता क्रमांक ४.३ मध्ये दाखविल्याप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

**तक्ता क्रमांक ४.३**

**भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) नुसार केंद्रीय सहाय्य (लाख रु.)**

**(आर्थिक वर्ष २०२२-२३)**

| वर्ष | मंजूर रक्कम | खर्च झालेली रक्कम | |
|---|---|---|---|
| २०१३-२०१४ | १२४८९.०० | १२४८९.०० | |
| २०१४-२०१५ | ११७०१.३० | ११७०१.३० | |
| २०१५-२०१६ | १३३७४.०० | १३३७४.०० | |
| २०१६-२०१७ | ११५३६.५३ | ११५३६.५३ | |
| २०१७-२०१८ | १२८६२.२४ | १२८६२.२४ | |
| २०१८-२०१९ | १७०१५.९१ | ७९९७.०१ | (प्रत्यक्ष खर्च) |
| २०१९-२०२० | २३१३६.७० | ९८८८.४२ | (प्रत्यक्ष खर्च) |
| २०२०-२०२१ | ४५७३.०० | – | |
| २०२१-२०२२ | – | – | |

(संदर्भ – कार्यक्रम अंदाजपत्रक २०२२-२३, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन पा. क्र. २)

तक्ता क्रमांक ४.३ वरून असे लक्षात येते की, आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१७-१८ पर्यंत दर वर्षी मंजूर झालेल्या निधी पैकी प्रत्यक्षात झालेला खर्च १०० टक्के असल्याचे दिसून येते.

आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये मंजूर रक्कम १७०१५.९१ लाख रुपये एवढी असून प्रत्यक्षात झालेल्या खर्च ७९६७.०१ लाख रुपये एवढा म्हणजे खर्चाचे प्रमाण ४७ टक्के आहे. तर आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये मंजूर रक्कम २३१३६.७० लाख रुपये एवढी असून प्रत्यक्षात झालेला खर्च ९८८८.४२ लाख रुपये एवढा म्हणजे खर्चाचे प्रमाण ४२.७ टक्के आहे.

### ४.१५ हिंगोली जिल्ह्यातील योजनांचा आढावा

हिंगोली जिल्ह्यात राबवल्या जाणाऱ्या योजना प्रामुख्याने तीन प्रकारच्या योजना दिसून येतात. त्या पुढील प्रमाणे

१) बिगर आदिवासी क्षेत्र (सर्वसाधारण योजना)
२) अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना)
३) आदिवासी उपयोजना क्षेत्रातील (TSP) किंवा आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील उपयोजना (OTSP)

वरील तीन प्रकारच्या विकास योजनांबरोबरच जिल्ह्यामध्ये खासदार स्थानिक विकास कार्यक्रम व आमदार स्थानिक विकास कार्यक्रम या योजनेअंतर्गत देखील विकास निधी त्यांच्या मतदार संघांमध्ये खर्च केला जातो. तसेच जिल्ह्यातील डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत डोंगरी भागात वास्तव्य करणाऱ्या जनसमुहासाठी ठराविक विकास निधी खर्च करण्यात येतो. जिल्ह्यातील लोकांना उपयुक्त ठरतील व सहजरीत्या पूर्ण होतील अशा प्रकारची लहान लहान कामे आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून घेतली जातात. हिंगोली जिल्ह्यात तीन विधानसभा मतदारसंघ आहेत या प्रत्येक मतदारसंघा मध्ये दरवर्षी दोन कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध होत असतो. तसेच खासदार स्थानिक विकास निधी म्हणून दरवर्षी पाच कोटी रुपये इतका विकास निधी उपलब्ध होतो. डोंगरी भागाच्या विकासासाठी विविध कार्यक्रमांतर्गत हिंगोली जिल्ह्यात हिंगोली व कळमनुरी असे दोन उपगट ठरविण्यात आले आहेत. हिंगोली उपगटात ६६ व कळमनुरी उपगटात ४० गावांचा समावेश करण्यात आला आहे. या

दोन उपगटासाठी प्रति उपगट पन्नास हजार लक्ष निधी सरकारतर्फे विकासासाठी वितरित करण्यात येते.

### १) सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना

हिंगोली जिल्ह्यात २०२१-२२ या आर्थिक वर्षात सर्वसाधारण योजनेअंतर्गत १६०००.०० लक्ष रुपये नियतव्य मंजूर करण्यात आला. या मंजूर नियतव्ययापैकी जिल्ह्यातील विविध विकास कामावर १५९८४.२२ लक्ष रुपये इतका निधी चालू आर्थिक वर्षात खर्च करण्यात आला. या खर्चाचे प्रमाण ९९.९ टक्के एवढी आहे. सर्वसाधारण योजने अंतर्गत सन २०२२-२३ या वर्षासाठी जिल्ह्याला २००००.०० लक्ष रुपये नियतव्यय म्हणून मंजूर झालेला आहे.

### २) अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना)

या योजनेअंतर्गत हिंगोली जिल्ह्याला २०२२-२२ या आर्थिक वर्षात ५१५०.०० लक्ष रुपये नियतव्य मंजूर करण्यात आला. या मंजुर नियतव्ययापैकी विविध विकास कामावर ५१५०.०० लक्ष रुपये खर्च करण्यात आला म्हणजेच खर्चाचे प्रमाण हे १०० टक्के एवढे आहे. अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) अंतर्गत सन २०२२-२३ या वर्षासाठी जिल्ह्याला ५१५०.०० लक्ष रुपये नियतव्यय म्हणून मंजूर झालेला आहे.

### ३) आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना (OTSP)

आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना (OTSP) या योजनेअंतर्गत हिंगोली जिल्ह्याला विकास निधी प्राप्त होत असतो व तो विविध विकास कामावर खर्च केला जातो. या योजनेअंतर्गत हिंगोली जिल्ह्याला २०२२-२२ या आर्थिक वर्षात १८१२.५२ लक्ष रुपये नियतव्य मंजूर करण्यात आला. या मंजुर नियतव्ययापैकी विविध विकास कामावर १७९९.७९ लक्ष रुपये खर्च करण्यात आला.

## ४) प्रधानमंत्री आवास योजना

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत इंदिरा आवास योजना राबविल्या जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी हा बीपीएल धारक असणे गरजेचे आहे. तसेच ग्रामसभेने लाभधारकांची निवड करणे आवश्यक आहे. पात्र लाभधारकाला या योजनेअंतर्गत घरकुल बांधकामासाठी तीन हप्त्यात अनुदान देण्यात येते. सन २०१६-१७ या वर्षापासून इंदिरा आवास योजना या योजनेचे नाव प्रधानमंत्री आवास योजना असे करण्यात आले आहे. घरे नसलेल्या कच्च्या घरात राहणाऱ्या लोकांना पक्की घरे मूलभूत सुविधांसह देण्याची योजना यामध्ये आहे. घरकुल बांधकामा करिता साधारण क्षेत्रात १.२० लाख रुपये तर नक्षलग्रस्त भागाकरिता १.३० लाख रुपये प्रति लाभार्थी अनुदान देण्यात येते. ही योजना केंद्र सरकार पुरस्कृत असून केंद्र व राज्य यांचा वाटा अनुक्रमे ६०% व ४०% कसा आहे. हिंगोली जिल्ह्यात या योजनेवर झालेल्या खर्चाचा आढावा पुढीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्रमांक ४.४**

**जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेवारील विविध घटकानुसार खर्च**

**(आर्थिक वर्ष-२०२१-२०२२)**

| अ. क्र. | तालुका | | झालेला खर्च (संदर्भ वर्षातील) (₹ लाखात) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | अल्पसंख्यांक | इतर | एकूण |
| (१) | (२) | | (२०) | (२१) | (२२) | (२३) | (२४) |
| १ | सेनगाव | ग्रामिण | ०.०० | १५.६० | ०.०० | ५७८.४० | ५९४.०० |
| | | नागरी | ४.२० | २.२० | ३६.८० | २७३.८ | ३१७.०० |
| २ | हिंगोली | ग्रामिण | ०.०० | ०.०० | ०.०० | १६४.४० | १६४.४० |
| | | नागरी | २३३.०० | २७.०० | २२९.०० | ६६७ | ११५६.०० |
| ३ | औंढा ना. | ग्रामिण | ०.०० | ९.६० | ०.०० | २३५.२० | २४४.८० |
| | | नागरी | ३०.०० | ४०.०० | १५८.०० | २३२.०० | ४६०.०० |
| ४ | कळमनुरी | ग्रामिण | ३.६० | ३.६० | ०.०० | ३५६.४० | ३६३.६० |
| | | नागरी | १५.०० | ५.०० | २.४० | २४२.०० | २६४.४० |
| ५ | वसमत | ग्रामिण | ०.०० | २.४० | ०.०० | ४५८.४० | ४६०.८० |
| | | नागरी | २१९.२० | ५६.०० | २६८.८० | ४४९ | ९९३.०० |
| **जिल्हा एकूण** | | **ग्रामिण** | **३.६०** | **३१.२०** | **०.००** | **१७९२.८०** | **१८२७.६०** |
| | | **नागरी** | **५०१.४०** | **१३०.२०** | **६९५.००** | **१८६३.८०** | **३१९०.४०** |

(संदर्भ– जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन -२०२२, जिल्हा हिंगोली. पा. क्र. १५१)

वरील तक्ता क्रमांक ४.४ वरून असे दिसून येते की हिंगोली जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिक वर्ष ३०३१-२२ मध्ये एकूण झालेला

खर्च ग्रामीण भागासाठी १८२७.६० लाख रुपये एवढा आहे तर नागरी भागासाठी ३१९०.४० लाख रुपये एवढा आहे.

या योजनेअंतर्गत अनुसूचित जमाती वर्गासाठी जिल्ह्यामध्ये झालेला एकूण खर्च ग्रामीण भागासाठी ३१.२० लाख रुपये एवढा आहे तर नागरी भागासाठी १३०.२० लाख रुपये एवढा आहे. या योजनेअंतर्गत कळमनुरी तालुक्यात अनुसूचित जमातीसाठी ग्रामीण भागासाठी ३.६० लाख रुपये तर नागरी भागासाठी ५.०० लाख रुपये एवढा खर्च झालेला आहे.

**तक्ता क्रमांक ४.५**

**जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेवारील सुरवतीपासूनचा खर्च**

**(आर्थिक वर्ष-२०२१-२०२२)**

| अ. क्र. | तालुका | | योजनेच्या सुरुवातीपासून संदर्भ वर्षापर्यंत | |
|---|---|---|---|---|
| | | | एकूण पूर्ण झालेली घरकुले | झालेला खर्च (₹ लाखात) |
| (१) | (२) | | (२५) | (२६) |
| १ | सेनगाव | ग्रामिण | १९६८ | २३६१.६० |
| | | नागरी | १९७ | ७५८.२० |
| २ | हिंगोली | ग्रामिण | १३२५ | १५९०.०० |
| | | नागरी | १७६२ | २६२२.८० |
| ३ | औंढा ना. | ग्रामिण | १३०८ | १५६९.६० |
| | | नागरी | ३८० | १०२०.०० |
| ४ | कळमनुरी | ग्रामिण | २०९८ | २५१७.६० |
| | | नागरी | ३३९ | ५२१.४० |
| ५ | वसमत | ग्रामिण | १७९१ | २१४९.२० |
| | | नागरी | ९३२ | १९७३.४० |
| **जिल्हा एकूण** | | **ग्रामिण** | **८४९०** | **१०१८८.००** |
| | | **नागरी** | **३६१०** | **६८९५.८०** |

टिप:- १) नागरी भागाच्या बाबतीत औंढा ना व हिंगोली येथे प्रवर्गनिहाय घरकुलांची उद्दीष्टे प्राप्त नाहीत. २) स्तंभ क्रं २५ व २६ मध्ये स्पीलच्या कामांची माहिती समाविष्ट आहे.

(संदर्भ– जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन -२०२२, जिल्हा हिंगोली. पा. क्र. १५१)

वरील तक्ता क्रमांक ५.९ वरून असे दिसून येते की हिंगोली जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या सुरुवातीपासून आर्थिक वर्ष २०२१-२२ पर्यंत झालेला एकूण खर्च ग्रामीण भागासाठी १०१८८.०० लाख रुपये एवढा आहे तर नागरी भागासाठी ६८९६.८० लाख रुपये एवढा आहे. याच कालावधीतील कळमनुरी तालुक्यातील या योजनेवर झालेला एकूण खर्च ग्रामीण भागासाठी २५१७.६० लाख रुपये एवढा आहे तर नागरी भागासाठी ५३१.४० लाख रुपये एवढा आहे.

**५) पारधी आवास योजना -**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादीमधील अनुक्रमांक ३८ वर पारधी समाजाची नोंद दर्शविण्यात आली आहे. पारधी जमाती अनुसूचित जमात म्हणून घोषित करण्यात आलेली आहे. राज्यातील विखुरलेल्या पारधी आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास साधनेच्या दृष्टीने, त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी तसेच त्यांचे राहणीमान व जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने त्यांना घरकुले सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या आवडीनुसार त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण व व्यवसायासाठी आर्थिक मदत, पारधी समाजाच्या वस्त्या मुख्य रस्त्यांशी जोडणे इत्यादी बाबी समाविष्ट असलेला पारधी विकास कार्यक्रम सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून राबविण्यात येत आहे. पारधी विकास कार्यक्रमांतर्गत घरकुल योजना राबवली जाते.

**तक्ता क्रमांक ४.६**

**जिल्ह्यातील पारधी आवास योजनेवारील खर्च**

**(आर्थिक वर्ष-२०२१-२०२२)**

| अ. क्र. | तालुका | योजनेच्या सुरुवातीपासून संदर्भ वर्षापर्यंत | |
|---|---|---|---|
| | | पुर्ण झालेली घरकुले | झालेला खर्च (₹ लाखात) |
| (१) | (२) | (२२) | (२३) |
| १ | सेनगाव | ० | ०.०० |
| २ | हिंगोली | २३ | २७.६० |
| ३ | औंढा ना. | ९ | १०.८० |
| ४ | कळमनूरी | ३ | ३.६० |
| ५ | वसमत | ० | ०.०० |
| जिल्हा एकूण | | ३५ | ४२.०० |

(संदर्भ– जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन -२०२२, जिल्हा हिंगोली. पा. क्र. १५४)

वरील तक्ता क्रमांक ४.६ वरून असे दिसून येते की हिंगोली जिल्ह्यातील पारधी आवास योजनेच्या सुरुवातीपासून आर्थिक वर्ष २०२१-२२ पर्यंत झालेला एकूण खर्च ४२.०० लाख रुपये एवढा आहे तर याच कालावधीतील कळमनुरी तालुक्यातील या योजनेवर झालेला एकूण खर्च ३.६० लाख रुपये एवढा आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील आजपर्यंत पुर्ण झालेल्या घरकुलाचु संख्या ३५ एवढी आहे. तर कळमनुरी तालुक्यातील संख्या एकूण ३ एवढी आहे.

# प्रकरण पाचवे
# आदिवासी समाजाचे आर्थिक विश्लेषण

**५.१ प्रस्तावना –**

प्रस्तुत प्रकरणांमध्ये कळमनुरी तालुक्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात आलेला आहे. भारतीय आदिवासी समाज हा जंगली भागात, डोंगरी भागात, दर्या खोऱ्यात निवास करतो. निसर्गाच्या सानिध्यात वास्तव्यास असल्याने नैसर्गिक भावनांचा सहज व सुंदर अविष्कार आदिवासींच्या जीवनात पाहायला मिळतो. जंगलातील वास्तव्यामुळे आदिवासींचे जीवन सतत कष्टमय असते. गरजापुरतीसाठी लागणाऱ्या वस्तू मिळविण्यासाठी रस्त्या अभावी त्यांना अनेक किलोमीटर अंतर पियपीट करावी लागते. दारिद्र्यामुळे सतत कष्ट करणे हेच त्यांचे जीवनक्रम बनले आहे. आदिवासी समाज वेळप्रसंगी उपाशी पोटी झोपतो परंतु भीक मागणे, चोरी करणे हे त्यांना मान्य नाही. नशिबी आलेला जीवनक्रम ते आनंदाने स्वीकारतात. सर्वसामान्य आदिवासी हा भोळा भाबडा अबोल आहे, त्याचप्रमाणे तो प्रामाणिक आहे.

आदिवासी लोकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीछ सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि त्यांच्या राहणीमनात सुधारणा करून आदिवासी समाज व इतर समाज यांच्यातील प्रगतीचे अंतर कमी करण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार मार्फत विविध आदिवासी विकास योजना राबविल्या जात आहेत. या विकास योजनांच्या अंमलबजावणीमुळे अध्ययन क्षेत्रातील आदिवासी समाजाच्या जीवनमानात झालेल्या बदलाचे अध्ययन प्रस्तुत संशोधकांनी केले आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये आदिवासी समाजाची आर्थिक स्थिती यावर आधारित आवश्यक तथ्य अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांकडून संकलित करून विशेषण केले आहे. आर्थिक स्थिती बाबत आवश्यक तत्त्व संकलित करण्यासाठी शेती व उत्पन्न बाबत माहिती, इतर व्यवसाय बाबत माहिती, शासकीय योजनांच्या लाभाबाबत माहिती, उपभोगावर खर्च इत्यादी प्रश्नांच्या आधारे तथ्य संकलित केले आहे. प्राप्त

तथ्यांची पडताळणी, वर्गीकरण सांकेतिकीकरण, सारणीकरण करून विश्लेषण केले आणि निष्कर्ष प्राप्त करण्यात आले आहे. हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील आदिवासी समाजाबाबत आवश्यक तथ्य संकलनासाठी आदिवासी समाजाच्या लोकसंख्येच्या आधारे तालुक्यातील एकूण लोकसंख्येपैकी ७५ टक्के पेक्षा जास्त आदिवासी समाजाची लोकसंख्या असलेल्या एकूण १५ गावाची निवड करण्यात आली. नमुना पाहण्यासाठी निवडलेल्या गावांची नावे तक्ता क्रमांक मध्ये १.१ दर्शविलेले आहे.

भारतातील आदिवासी समाज हा जंगल, डोंगर, दरीखोरी यामध्ये निवास करतो. आदिवासी जीवन म्हणजे मुक्त, स्वच्छंदी आणि निरामय असून संस्कृती व सुधारणांच्या नावाखाली शहरी जीवनात निर्माण झालेली विकृत व पांढरपेशी जीवनपद्धती त्यांच्यात अद्याप शिरलेली नाही. आदिवासी जीवन म्हणजे सतत कष्टमय असते. जंगलात मिळणारी फळे, कंदमुळे जमा करणे, शिकार करणे, लाकुड फाटा विकून तेल, मीठ, मिरची, कापड व इतर सामान मिळविण्यासाठी रस्ते अभावी त्यांना अनेक किलोमीटर पायपीट करावी लागते. आदिवासींची एक स्वतंत्र संस्कृती आहे. त्यामुळे शहरी भागापासून दूर राहायला आदिवासी लोकांना आवडते म्हणूनच आदिवासींना जंगलाचे राजे संबोधण्यात येते. हिंगोली जिल्हा हा ग्रामीण भागातील व मागासलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात मोठमोठे उद्योग प्रकल्प स्थापन झालेले नाहीत. त्यामुळे जिल्ह्यात पुरुषा प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होत नाहीत म्हणून हिंगोली जिल्ह्यातील आदिवासींना शेती पूरक रोजगारासाठी जंगल व्यवसायावरच अवलंबून राहावे लागते.

### ५.२ व्यवसायानुसार वर्गीकरण

कोणत्या व्यक्तीची आर्थिक प्रगती साधण्यासाठी रोजगाराची उपलब्ध असणे आवश्यक ठरते. रोजगार उपलब्ध असेल तर कुटुंबाच्या विविध गरजांची पूर्तता करणे शक्य होते. अन्यथा गरिबी. दारिद्र्य, उपासमार उपोषण इत्यादी सारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. कळमनुरी तालुक्यातील नमुना पाण्यासाठी निवडलेल्या आदिवासी

समाजाच्या कुटुंबाचे त्यांचे व्यवसायानुसार करण्यात आलेले वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.१ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ५.१**

**नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे व्यवसायानुसार केलेले वर्गीकरण**

| अ. क्र. | व्यवसाय | कुटुंब संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शेती | १७४ | ७७.४% |
| २ | शेतमाजुरी | ३२ | १४.२% |
| ३ | नोकरी | ५ | २.२% |
| ४ | इतर व्यवसाय | १४ | ६.२% |
| **एकूण** | | **२२५** | **१००%** |

(संदर्भ – प्रत्यक्ष नमूना पाहणी २०२१-२२)

वरील तबला क्रमांक ५.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे नमुना पाहण्यासाठी निवडलेल्या २२५ आदिवासी कुटुंबापैकी १७८ कुटुंब (७९.१%) शेती व्यवसायावर अवलंबून असून शेतमजुरी करणारे कुटुंब ३८ (१६.९%) एवढे आहेत. नोकरी व्यवसायात ५ (२.२%) तर इतर व्यवसायात ४ (१.८%) कुटुंब कार्यरत आहेत.

या विश्लेषणावरून असा निष्कर्ष प्राप्त होतो की, आदिवासी समाजामध्ये शेती व्यवसाय करणाऱ्या कुटुंबाची संख्या सर्वाधिक आहे. अज्ञान रूढी व परंपरा तसेच धार्मिक पगडा या कारणामुळे आदिवासी समाजात पारंपारिक शेती व्यवसाय करण्यावरच अधिक भर दिला जातो. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून इतर व्यवसायाचा आधार घेतला जातो. शिक्षणाच्या अभावी नोकरी व्यवसायाचे प्रमाण अगदी नगण्य असल्याचे दिसते.

### ५.३ शेत जमिनीच्या आकारमानुसार वर्गीकरण

कळमळी तालुक्यातील नमुने पाहण्यासाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाकडे उपलब्ध असलेल्या शेत जमिनीच्या आकारानुसार वर्गीकरण केले असता याची माहिती पुढील तक्ता क्रमांक ५.२ प्रमाणे दर्शवलेली आहे.

**तक्ता क्रमांक ५.२**

**नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे शेत जमिनीच्या आकारामानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | शेत जमीन आकार | कुटुंब संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ५ एकर पर्यन्त | १६२ | ७२% |
| २ | ५ एकर ते १० एकर पर्यन्त | ९ | ४% |
| ३ | १० एकर पेक्षा जास्त | ३ | १.३% |
| ४ | एकूण भूधारक कुटुंबे (१+२+३) | १७४ | ७७.३% |
| ५ | भूमिहीन कुटुंबे | ५१ | २२.६% |
| **एकूण आधारभूत कुटुंबे (४+५)** | | **२२५** | **१००%** |

(संदर्भ – प्रत्यक्ष नमूना पाहणी २०२१-२२)

वरील तक्ता क्रमांक ५.३ वरून असे दिसून येते की नमुना पाहण्यासाठी निवडलेल्या एकूण २२५ आदिवासी कुटुंबापैकी शेत जमीन असणाऱ्या कुटुंबांची एकूण संख्या १७४ म्हणजेच ७७.३% एवढी आहे, तर भूमिहीन कुटुंबाची संख्या ५१ (२२.६%) एवढी आहे. नमुना पाहणी केलेले एकूण भूधारक आदिवासी कुटुंब १६२ (७२%) हे ५ एकर पेक्षा कमी शेत जमीन आकार असणारे म्हणजेच अल्पभूधारक गटात मोडणारे आहेत. ५ एकर ते १० एकर पर्यंत शेतजमीन असणाऱ्या कुटुंबांची

संख्या ९ (४%) एवढी आहे तर १० एकर पेक्षा जास्त शेतजमीन असणाऱ्या कुटुंबांची संख्या ३ (१.३%) एवढी आहे.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की भूमिहीन कुटुंबा पेक्षा भूधारक कुटुंबाची संख्या जास्त आहे. असे असले तरी एकूण भूधारक कुटुंबापैकी अल्पभूधारक कुटुंबाची संख्या सर्वाधिक आहे. आदिवासी कुटुंबाकडे शेत जमिनीचा आकार अत्यंत कमी असल्यामुळे त्यांच्या उत्पन्नाचे प्रमाण अत्यल्प असून आदिवासी समाजात दारिद्र्याचे प्रमाण जास्त असण्याचे हे एक कारण आहे.

## ५.४ सिंचन साधनानुसार वर्गीकरण

वर्षानुवर्ष आदिवासी समाजाचा मुख्य व्यवसाय शेती हाच राहिलेला आहे. आजही आदिवासी समाजाचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. असे असले तरी शेती व्यवसायातून घेतले जाणारे उत्पन्न मात्र केवळ उदरनिर्वाह पुरते मर्यादित असल्याचे दिसून येते. शेती व्यवसायाचे उत्पन्न निसर्गावर अवलंबून असते. जर सिंचन साधने उपलब्ध नसतील तर शेती उत्पन्नात वाढ करणे शक्य होत नाही. नमुना पाहणी साठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे शेती व्यवसायासाठी उपलब्ध असलेल्या मुख्य सिंचन साधनुसार केलेले वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.३ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ५.३**

**नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे सिंचन साधनानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | सिंचन साधन | कुटुंब संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | तलाव | ३५ | १५.५% |
| २ | विहीर | २५ | ११.१% |
| ३ | कुपनलिका/बोरवेल | १७ | ७.६% |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | नदी/प्रकल्प/कालवा | १५ | ६.७% |
| ५ | नैसर्गिक पाऊस | १३३ | ५९.१% |
| **एकूण** | | **२२५** | **१००%** |

(संदर्भ – प्रत्यक्ष नमूना पाहणी २०२१-२२)

सिंचनासाठी वापरले जाणारे मुख्य साधन यानुसार वर्गीकरण केले असता वरील तक्ता क्रमांक ५.४ वरून असे दिसून येते की नमुना पाहण्यासाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबामध्ये सिंचनासाठी तलावाचे वापर करणारे एकूण कुटुंब ३५ (१५.५ टक्के) एवढे आहेत तर विहीर या सिंचन साधण्याचा वापर करणारे कुटुंब २६ (११.१ टक्के) एवढे आहेत. कुपनलिका/ बोरवेल या साधनाचा वापर करणारे कुटुंब १७ (७.६ टक्के) तर नदी/ प्रकल्प/ कालवा या साधनांचा वापर करणारी कुटुंब संख्या १५ (६.७टक्के) एवढी आहे. नैसर्गिक पावसावर अवलंबून असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या सर्वाधिक १३३ म्हणजे ५९.१ टक्के एवढी आहे.

या विश्लेषण वरून असे स्पष्ट होते की, आदिवासी समाजाचा मुख्य व्यवसाय शेती हा असला तरी आदिवासी समाजाचे वास्तव्य असणाऱ्या भागांमध्ये सिंचनाच्या सुविधा फार कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे त्यांचा शेती व्यवसाय हा सर्वात जास्त नैसर्गिक पावसावर अवलंबून आहे.

### ५.५ शेती पूरक व्यवसायानुसार वर्गीकरण

आदिवासी समाजाचा प्रमुख व्यवसाय शेती असल्याने आदिवासी समाजाचा उदरनिर्वाह शेती व्यवसायावर अवलंबून आहे. परंतु शेतीचे उत्पन्न कमी असल्याने त्यांच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण करणे शक्य होत नाहीत. म्हणून शेतीला पूरक अशा इतर व्यवसायाचा आधार त्यांना घ्यावा लागतो. नमुना पाहण्यासाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे शेती पूरक व्यवसायानुसार वर्गीकरण केले असता त्याची माहिती खालील तक्ता क्रमांक ५.४ मध्ये दाखवल्याप्रमाणे आहे.

खालील तक्ता क्रमांक ५.५ मध्ये दर्शविल्या प्रमाणे असे लक्षात येते की, नमूना पाहणीसाठी निवड करण्यात आलेल्या २२५ आदिवासी कुटुंबामध्ये शेतीला पूरक व्यवसाय म्हणून वनसंपत्ती गोळा करणारे कुटुंब संख्या १३७ (६०.९%) एवढी आहे. तर शेळी पालन करणारे कुटुंब २५ (११.१%), कुक्कुड पालन करणारे कुटुंब २५ (१२%), वराह पालन करणारे कुटुंब ४ (१.८%) व दुधव्यवसाय करणारे कुटुंब ३२ (१४.२%) एवढे आहेत.

**तक्ता क्रमांक ५.४**

**नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे शेती पूरक व्यवसायानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | सिंचन साधन | कुटुंब संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | वन्य वस्तु गोळा करणे | १३७ | ६०.९% |
| २ | शेळी पालन | २५ | ११.१% |
| ३ | कुक्कुट पालन | २७ | १२% |
| ४ | वराह पालन | ४ | १.८% |
| ५ | दुगधव्यवसाय | ३२ | १४.२% |
| **एकूण** | | **२२५** | **१००%** |

(संदर्भ – प्रत्यक्ष नमूना पाहणी २०२१-२२)

वरील विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की, आदिवासी समाजामध्ये शेतीला पूरक व्यवसाय म्हणून वनसंपत्ती गोळा करणे यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

### ५.६ वार्षिक उत्पन्न गटानुसार वर्गीकरण

भारतीय आदिवासी समाज दारिद्र्य शिक्षण आरोग्य इत्यादी दृष्टीने अत्यंत मागास अवस्थेत असल्याचे दिसून येते. या समाजाच्या वास्तव्याच्या ठिकाणी आधुनिक सोयी सुविधांचा अभाव दिसून येतो. आदिवासी समाजाचा प्रमुख व्यवसाय शेती असून तो पारंपरिक पद्धतीने केला जातो तसेच शेती व्यवसायातून उदरनिर्वाह प्रत्येक उत्पन्न घेतल्या जाते नमुना पाहण्यासाठी निवड केलेल्या आदिवासी कुटुंबाचे उत्पन्न गटानुसार वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक ५.५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे केले आहे.

**तक्ता क्रमांक ५.५**

**नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न गटानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | वार्षिक उत्पन्न गट (रु.) | कुटुंब संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २५.००० पर्यन्त | १२६ | ५६.०% |
| २ | २५,००१ ते ५०,००० | २९ | १२.९% |
| ३ | ५०,००१ ते ७५,००० | ६८ | ३०.२% |
| ४ | ७५,००१ ते १,००,००० | २ | ०.९% |
| ५ | १,००,००१ पेक्षा जास्त | ०० | ०.०% |
| **एकूण** | | **२२५** | **१००%** |


(संदर्भ – प्रत्यक्ष नमूना पाहणी २०२१-२२)

वरील तक्ता क्रमांक ५.६ व आलेख क्रमांक ५.१ मध्ये नमुना पाहणीसाठी निवड केलेल्या आदिवासी कुटुंबाचे सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न गटानुसार विश्लेषण केले असता असे निदर्शनास येते की, वार्षिक उत्पन्न गट २५,००० रुपये असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या सर्वाधिक म्हणजे १२६ (५६ टक्के) एवढी आहे. त्यानंतर

५०,००१ ते ७५,००० रुपये या उत्पन्न गटातील आदिवासी कुटुंबांची संख्या ६८ म्हणजेच ३०.२ टक्के एवढी, २५,००१ ते ५०,००० रुपये या उत्पन्न गटातील आदिवासी कुटुंबाची संख्या २९ असून त्यांचे प्रमाण १२.९ टक्के एवढे आहे तर सर्वात कमी कुटुंबाची संख्या २ असून त्यांचा उत्पन्न गट ७५,००१ ते १,००,००० रुपये आहे. १,००,००१ रुपये पेक्षा जास्त या उत्पन्न गटातील आदिवासी कुटुंबांची संख्या दिसून आली नाही.

**आलेख क्रमांक ५.१**

**नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न गटानुसार वर्गीकरण**




वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, आदिवासी समाजामध्ये अल्प वार्षिक उत्पन्न गटात जीवन जगणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक आहे. आदिवासींच्या उत्पन्न वाढीच्या अनेक विकास योजना राबविल्या जात आहेत. परंतु त्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नसल्याने त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होत नाही.

| **वार्षिक उत्पन्न गट (रु.) (वर्गांतर )** | **कुटुंब संख्या (आवृत्ती)** | **संचायी आवृत्ती** |
|---|---|---|
| ००,००० ते २५.००० | १२६ | १२६ |
| २५,००१ ते ५०,००० | २९ | (१२६+२९) = १५५ |
| ५०,००१ ते ७५,००० | ६८ | (१५५+६८) = २२३ |
| ७५,००१ ते १,००,००० | २ | (२२३+२) = २२५ |

वरील आकडेवारीच्या आधारावर मध्यांक वर्गांतर पुढीलप्रमाणे काढला आहे.

मध्यांक वर्गांतर = N/२ व्या पदाचे मूल्य

= २५५/२ = ११२.५

११२.५ व्या पदाची स्थिति संचायी आवृत्ती मध्ये १२६ मध्ये आहे. ज्याचे वर्गांतर ००,००० ते २५,००० आहे. हाच मध्यांत वर्गांतर आहे. यावरून मध्यांकाचे मूल्य खालील सूत्रानुसार काढता येईल .

$$Me = L + \frac{N/२ - F}{f} \times i$$

$$= ००,००० + \frac{२५५/२ - ०}{१२६} \times २५,०००$$

$$= ००,००० + २२,३२१.४$$

$$= २२,३२१.४$$

वरील सूत्रनुसार आदिवासी समाजाच्या उत्पन्नाचा मध्यांक२२,३२१.४ एवढा आहे.

## ५.७ कर्जाच्या साधनांनुसार वर्गीकरण

आदिवासी समाजात दारिद्र्य, बेरोजगारी यांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसते. त्यांच्या उत्पन्नाचे प्रमाण कमी असल्याने विविध सामाजिक व धार्मिक कार्य पार पाडण्यासाठी कर्जाचा आधार घ्यावा लागतो. नमुना पाहणीसाठी निवड केलेल्या आदिवासी कुटुंबाचे त्यांच्या कर्जाच्या विविध मार्गानुसार वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे केले आहे.

**तक्ता क्रमांक ५.६**

**नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे कर्जाच्या साधनांनुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | कर्जाचा स्त्रोत | कुटुंब संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नातेवाईक | २२ | ९.८% |
| २ | सावकार | ७ | ३.१% |
| ३ | सहकारी बँका | ७२ | ३२% |
| ४ | कृषि विकास बँका | १२ | ५.३% |
| ५ | बचत गट | ८८ | ३९.१% |
| ६ | कर्ज न घेतलेले | २४ | १०.७% |
| **एकूण** | | **२२५** | **१००%** |

(संदर्भ – प्रत्यक्ष नमूना पाहणी २०२१-२२)

वरील तक्ता क्रमांक ५.६ मध्ये दर्शविल्यानुसार नमुना पाहणीसाठी निवड केलेल्या २२५ आदिवासी कुटुंबापैकी नातेवाईकांकडून कर्ज घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण २२ (९.८ टक्के), सावकाराकडून ७ (३.१ टक्के), सहकारी बँका यांच्याकडून ७२ (३२ टक्के), कृषी विकास बँक यांच्याकडून १२ ( ५.३ टक्के), बचत गटांकडून ८८ (३९.१ टक्के) असे आहे. तर कर्ज न घेतलेल्या आदिवासी कुटुंबाचे प्रमाण २४ (१०.७ टक्के) एवढे आहे.

या विश्लेषणावरून असा निष्कर्ष निघतो की आदिवासी कुटुंबात कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण ७५ टक्के पेक्षा जास्त आहे. कर्ज घेणाऱ्या कुटुंबामध्ये महिला बचत गटामार्फत कर्ज घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसते.

## ५.८ आदिवासी विकास योजनांच्या माहितीनुसार वर्गीकरण

दुर्गम व जंगली भागातील वास्तव्य आणि शिक्षणाचा अभाव यामुळे आदिवासी समाजाला त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विकास योजनविषयी पूर्णपणे माहिती मिळत नासल्याचे दिसून येते . नमूना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाला आदिवासी विकास योजनांची माहिती कितपत आहे याचा आढावा तक्ता क्रमांक ५.७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे घेतलेला आहे.

तक्ता क्रमांक ५.७ वरुन असे दिसून येते की, नमूना पाहणीसाठी निवडलेल्या एकूण २५५ आदिवासी कुटुंबापैकी १६८ (७४.६%) कुटुंबांना आदिवासी विकास योजनाविषयी माहिती आहे. तर ५७ (२५.४%) आदिवासी कुटुंबांना आदिवासी विकास योजनाविषयी माहिती नाही.

वरील विश्लेषणावरून असा निष्कर्ष निघतो की, २५% पेक्षा जास्त आदिवासी कुटुंबांना आदिवासी विकास योजनांची माहिती नसल्याने ते या योजनांपासून वंचित आहेत.

### तक्ता क्रमांक ५.७
### नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे आदिवासी विकास योजनांच्या माहितीनुसार वर्गीकरण

| अ. क्र. | तपशील | कुटुंब संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आदिवासी विकास योजनांची माहिती असलेली कुटुंबे | १६८ | ७४.६% |
| २ | आदिवासी विकास योजनांची माहिती नसलेली कुटुंबे | ५७ | २४.४% |
| **एकूण** | | **२२५** | **१००%** |

(संदर्भ – प्रत्यक्ष नमूना पाहणी २०२१-२२)

## ५.९ योजनांच्या माहिती स्त्रोतनुसार वर्गीकरण

नमूना पाहणीसाठी निवडलेल्या एकूण २५५ आदिवासी कुटुंबापैकी १६८ (७४.६%) कुटुंबांना आदिवासी विकास योजनाविषयी माहिती आहे.या कुटुंबांना आदिवासी विकास योजनाची माहिती मिळणाऱ्या स्त्रोतनुसार वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.८ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता क्र. ५.८ वरून असे लक्षात येते की, नमूना पाहणीसाठी निवडलेल्या २२५ कुटुंबा पैकी १६८ कुटुंबांना आदिवासी विकास योजनांची माहिती आहे. या कुटुंबापैकी ४९ (२९.२%) कुटुंबांना दैनिक वर्तमान पत्र या मार्गाने महिती मिळाली आहे. तर २७ (१६.१%) कुटुंबांना आकाशवाणी, २१ (१२.५%) कुटुंबांना दूरदर्शन संच, १५ (९%) कुटुंबांना ईचौपाल, ११ (६.५%) कुटुंबांना शासकीय कार्यालय या मार्गाने माहिती मिळाली आहे. इतर मार्गाने ४५ (२७%) कुटुंबांना माहिती मिळाली आहे.

**तक्ता क्रमांक ५.८**

**नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे आदिवासी विकास योजनांच्या माहितीच्या स्त्रोतानुसार वर्गीकरण**

| **अ. क्र.** | **माहितीचा स्त्रोत** | **कुटुंब संख्या** | **प्रमाण** |
|---|---|---|---|
| १ | दैनिक वर्तमान पत्र | ४९ | २९.२% |
| २ | आकाशवाणी | २७ | १६.१% |
| ३ | दूरदर्शन संच | २१ | १२.५% |
| ४ | ई-चौपाल | १५ | ९.० % |
| ५ | शासकीय कार्यालय | ११ | ६.५% |
| ६ | इतर | ४५ | २७.०% |
| **एकूण** | | **१६८** | **१००%** |

(संदर्भ – प्रत्यक्ष नमूना पाहणी २०२१-२२)

या वरून असा निष्कर्ष प्राप्त होतो की, आदिवासी कुटुंबांना सर्वाधिक दैनिक वर्तमान पत्र या माहितीच्या स्त्रोतमधून आदिवासी विकास योजनांची माहिती प्राप्त होते. त्यानंतर इतर स्त्रोत या मध्ये मित्र, नातेवाईक, समाजसेवक, लोकप्रतिनिधी या मार्गाने माहिती प्राप्त होतो.

## ५.१० विकास योजनानुसार लाभार्थी कुटुंबाचे वर्गीकरण

नमूना पाहणीसाठी निवडलेल्या एकूण २५५ आदिवासी कुटुंबाचे विविध विकास योजनांचा घेतलेल्या लभाचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.९ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ५.९**


**नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील लाभार्थी यांचे विकास योजनानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | विकास योजना | कुटुंब संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | इदिरा आवास योजना | ९१ | ४०% |
| २ | दशलक्ष विहीर योजना | ६५ | २८.९% |
| ३ | वीजपंप / तेलपंप | ६० | २६.७% |
| ४ | पी. व्ही. सी. पाईप | १० | ४.४% |
| ५ | शासकीय वसतिगृह | ९४ | ४२.२ |
| ६ | शासकीय आश्रम शाळा | १५९ | ७०.७ |
| ७ | शिशवृत्ती | १८० | ८० |
| ८ | लाभ न घेतलेले | ४५ | २० |
| **एकूणआधारभूत कुटुंबे** | | **२२५** | **१००%** |

(संदर्भ – प्रत्यक्ष नमूना पाहणी २०२१-२२)

वरील तक्ता क्र. ५.९ व आलेख क्रमांक ५.२ वरुण असे दिसून येते की, नमूना पाहणीसाठी निवडलेल्या २२५ आदिवासी कुटुंबामध्ये इदिरा आवास योजना ९१ (४०%), दशलक्ष विहीर योजना ६५ (२८.९%), वीजपंप / तेलपंप ६० (२६.७%), पी. व्ही. सी. पाईप १० (४.४%), शासकीय वसतिगृह ९४ (४२.२), शासकीय आश्रम शाळा १५९ (७०.७), शिशवृत्ती १८० (८०) अशी लाभार्थी कुटुंब संख्या आहे. तर वरील कोणत्याही योजनेचा लाभ न घेतलेली कुटुंब संख्या ४५ (२०%) आहे.

### आलेख क्रमांक ५.२
### नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबातील लाभार्थी यांचे विकास योजनानुसार वर्गीकरण




या विश्लेषणावरून असा निष्कर्ष निघतो की, आदिवासी विकास योजनांच्या इतर योजनपेक्षा शैक्षणिक विकासाच्या योजनांचा लाभ घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

### ५.११ व्यसन प्रकारानुसार वर्गीकरण

आदिवासी समाजातील कुटुंबामध्ये व्यसनाचे स्वरूप कसे आहे,हे माहीत करून घेण्यासाठी आदिवासी समाजाचे व्यसन प्रकारानुसार वर्गीकरण केले असता प्राप्त आकडेवारी तक्ता क्रमांक ५.१० मध्ये दर्शविली आहे.

### तक्ता क्रमांक ५.१०

### नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे व्यसन प्रकारानुसार वर्गीकरण


| अ. क्र. | व्यसन प्रकार | कुटुंब संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मद्यप्राशन | ७० | ३१.१% |
| २ | मद्यप्राशन व तांबाखुजन्य पदार्थ | १४६ | ६४.९% |
| ३ | व्यसन विरहित | ९ | ४% |
| **एकूण** | | **२२५** | **१००%** |

(संदर्भ – प्रत्यक्ष नमूना पाहणी २०२१-२२)

वरील तक्ता क्र. ५.१० व आलेख क्रमांक ५.३ वरुण असे दिसून येते की, नमूना पाहणीसाठी निवडलेल्या एकूण २२५ आदिवासी कुटुंबापैकी १४६ कुटुंब मद्यप्राशन व तांबाखुजन्य पदार्थ सेवन करणारे असून ७० कुटुंब मद्यप्राशन करणारे आहेत. कोणत्याही प्रकारचे व्यसन न करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ९ (४%) आहे.

या वरून असे स्पष्ट होते की, आदिवासी कुटुंबामध्ये व्यसनाचे प्रमाण खूप जास्त असून विविध सण-समारंभ, धार्मिक विधी,विवाह प्रसंग इत्यादि कार्य पार पाडण्यासाठी व्यसनाला महत्व दिले जाते.

## आलेख क्रमांक ५.३
## नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे व्यसन प्रकारानुसार वर्गीकरण



## प्रकरण सहावे

# निष्कर्ष व शिफारशी

### ६.१ गृहीतकृत्यांचे परीक्षण

**१. शासकीय योजनांमुळे आदिवासींच्या उत्पन्नात वाढ होत आहे**

प्रस्तुत संशोधन प्रकल्पाचा अभ्यास केला असता असे दिसून येते की नमूना पाहणीसाठी निवडलेल्या एकूण २२५ आदिवासी कुटुंबापैकी विविध योजनांचा लाभ घेतलेली कुटुंबे १८० आहेत यापैकी विकास योजनांमुळे उत्पन्नात वाढ होण्यास मदत झाली असे सांगणारे कुटुंब११० (६१.१%) दिसून आले. तसेच ५०,००१ ते ७५,००० या उत्पन्न गटातील कुटुंब संख्या ६८ (३०.२%) दिसून येते. यावरून असे स्पष्ट होते की, शासकीय योजनांमुळेआदिवासींच्या उत्पन्नात वाढ होत आहे.

**२. आदिवासींच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा होत आहे.**

गवताच्या झोपडीमद्धे, कच्च्या छताच्या घरामध्ये निवास करणारा आदिवासी समाज पक्के छताच्या घरामध्ये निवास करू लागला आहे. इदिरा आवास योजनेचा लाभ घेतलेली कुटुंब संख्या९१ (४०%) दिसून आली. यावरून आदिवासींच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा होत आहे, हे गृहीतक सिद्ध होते.

**३. बहुतांश आदिवासी कुटुंबे दारिद्र्यात जीवन जगतात**

राष्ट्रीय ते स्थानिक पातळीवर राबविण्यात येणाऱ्या आदिवासी विकास योजनांची व्याप्ती विस्तृत आहे. असे असले तरी योजनांच्या माहितीचा अभाव व आदिवासी समाजापर्यंत योजना पोहोचवीन्यत प्रशासकीय यंत्रणेचे अपयश दिसून येते. नमूना पाहणी केलेल्या कुटुंबामध्ये आदिवासी विकास योजनांची माहिती नसलेली कुटुंबे५७ (२४.४%) आहेत. उत्पन्न गटाणूसार वर्गीकरण केले असता २५.००० पर्यन्त उत्पन्न असणाऱ्या कुटुंबाची संख्या सर्वाधिक १२६ (५६.०%) आहेत. यावरून बहुतांश आदिवासी कुटुंबे दारिद्र्यात जीवन जगतात हे स्पष्ट होते.

### ४. शासकीय योजनांचा लाभ आदिवासींपर्यंत पोहोचत नाही

योजनांच्या माहितीचा अभाव व आदिवासी समाजापर्यंत योजना पोहोचवीन्यत प्रशासकीय यंत्रणेचे अपयश दिसून येते. त्यामुळे शासकीय योजनांचा लाभ आदिवासींपर्यंत पोहोचत नाही. नमूना पाहणी केलेल्या कुटुंबामध्ये आदिवासी विकास योजनांची माहिती नसलेली कुटुंबे ५७ (२४.४%) आहेत. तसेच नमूना पाहणी केलेल्या कुटुंबामध्ये कोणत्याही योजनेचा लाभ न घेतलेली कुटुंब संख्या ४५ (२०%) एवढी आहे. यावरून शासकीय योजनांचा लाभ आदिवासींपर्यंत पोहोचत नाही हे सिद्ध होते.

### ५. आदिवासी समाजात व्यसनाचे प्रमाण अधिक आहे

आदिवासी समाजात उच्च शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने वैज्ञानिक दृष्टीचा अभाव व अंधश्रद्धेचे प्रमाण जास्त दिसून येते. नमुना पाहणीसाठी निवडलेल्या आदिवासी कुटुंबाचे व्यसन प्रकारानुसार वर्गीकरण केले असता मद्यप्राशन व तांबाखुजन्य पदार्थ यांचा व्यसन करणारे एकूण कुटुंब संख्या २१६ (९६%) आहे. यावरून आदिवासी समाजात व्यसनाचे प्रमाण अधिक आहे हे सिद्ध होते.

## ६.२ निष्कर्ष

'आदिवासी समाजाच्या सक्षमीकरणाच्या शासकीय योजनांचा अर्थशास्त्रीय अभ्यास: विषय संदर्भ कळमनुरी तालुका' हा विषय लघु शोध प्रकल्पासाठी निवड करण्यात आला. या विषयाला अनुसरून अध्ययन केले असता प्राप्त निष्कर्ष पुढीलप्रमाणे

१. शेती व शेतमाजुरीवर अवलंबून असणारे जीवन, निरक्षरता, निसर्गवारील अवलंबीत्व या मूळे सर्वच भागातील आदिवासी आर्थिक दृष्ट्या मागासलेले दिसून येतात.
२. उत्पन्नाचे साधने मर्यादित असल्याने दैनंदिन उपभोगासाठी तसेच इतर कार्य पार पाडण्यासाठी आदिवासी समाजाला कर्जाचा आधार घ्यावा लागतो.
३. आदिवासी समाजामध्ये शेती व्यवसाय करणाऱ्या कुटुंबाची संख्या सर्वाधिक १७४ (७७.४%) आहे.

४. अज्ञान रूढी व परंपरा तसेच धार्मिक पगडा या कारणामुळे आदिवासी समाजात पारंपारिक शेती व्यवसाय करण्यावरच अधिक भर दिला जातो.

५. शिक्षणाच्या अभावी नोकरी व्यवसायाचे प्रमाण अगदी नगण्य ५ (२.२%) असल्याचे दिसते.

६. एकूण भूधारक कुटुंबापैकी अल्पभूधारक कुटुंबाची संख्या सर्वाधिक १६२ ( ७२%) आहे.

७. आदिवासी समाजाचे वास्तव्य असणाऱ्या भागांमध्ये सिंचनाच्या सुविधा फार कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे १३३ (५९.१%) कुटुंबाची शेती व्यवसाय पूर्णपणे नैसर्गिग पाऊसवर अवलंबून आहे.

८. आदिवासी समाजामध्ये शेतीला पूरक व्यवसाय म्हणून वनसंपत्ती गोळा करणे यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक १३७ (६०.९%) आहे.

९. आदिवासी समाजामध्ये अल्प वार्षिक उत्पन्न गटात जीवन जगणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

१०. आदिवासींच्या उत्पन्न वाढीच्या अनेक विकास योजना राबविल्या जात आहेत. परंतु त्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नसल्याने त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होत नाही.

११. आदिवासी कुटुंबात कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण ७५ टक्के पेक्षा जास्त आहे. कर्ज घेणाऱ्या कुटुंबामध्ये महिला बचत गटामार्फत कर्ज घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसते.

१२. २५% पेक्षा जास्त आदिवासी कुटुंबांना आदिवासी विकास योजनांची माहिती नसल्याने ते या योजनांपासून वंचित आहेत.

१३. आदिवासी कुटुंबांना सर्वाधिक दैनिक वर्तमान पत्र या माहितीच्या स्त्रोतमधून आदिवासी विकास योजनांची माहिती प्राप्त होते.

१४. आदिवासी विकास योजनांच्या इतर योजनपेक्षा शैक्षणिक विकासाच्या योजनांचा लाभ घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

### ६.३ शिफारशी

१. आदिवासीची वस्ती जंगलाच्या सानिध्यात आहे. तसेच आदिवासी भाग वनसंपदेने संपन्न आहे. आदिवासीनचे सहाय्य घेऊनच त्या संपतीचा वापर देशासाठी करावे म्हणजेच आदिम जीवन जतन करून देशाची प्रगती साधने शक्य होईल.

२. आदिवासींच्या भागातील परिसरातील जनगलसंपत्तीवर त्यांचा पूर्ण अधिकार आहे. त्यामुळे जंगलातील वनौपजिवे गोळा करतांना त्या त्या ठिकाणच्या वांपालकडून आदिवासीची होणारी अडवणूक व लुबाडणूक थांबवावी .

३. आदिवासी समाजात भूमिहीन कुटुंबाचे प्रमाण अधिक दिसून येते.शासनाच्या ताब्यातील जमिनीचे योग्य वाटप भूमिहीन आदिवासी कुटुंबामध्ये करावे ज्यामुळे दारिद्रय व कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

४. राष्ट्रीय ते स्थानिक पातळीवर राबविण्यात येणाऱ्या आदिवासी विकास योजनांची व्याप्ती विस्तृत आहे. परंतु त्याचा फारच अल्प प्रमाणात लाभ आदिवासी समाजापर्यंत पोहचतांना दिसून येते. तेव्हा विविध आदिवासी विकास योजनांचा लाभ आदिवासींना प्रत्यक्षात कसा मिळेल या दृष्टीने शासन स्तरावरून योग्य ती कार्यवाही व अंमलबजावणी करावे.

५. आदिवासींना विविध विकास योजनांची माहिती नसते जरी माहिती असली तरी योजनेची प्रक्रिया किचकट असल्याने आदिवासी या योजनांच्या भानगडीत पडत नाही. त्यामुळे योजना अंमलबाजवणीची प्रक्रिया सुलभ करण्यात यावी म्हणजेच शासकीय कर्मचाऱ्यांची अनास्था व अयोग्य वागणूक दूर करावी .

६. आदिवासी विकास विभागातील कार्यरत कर्मचाऱ्यांची अनास्था व अयोग्य वागणूक यामूळे आदिवासी योजनांपासून वंचित राहतो. त्या मूळेआदिवासी प्रशासनामध्ये आदिवासी तरूणांचीच प्राध्यान्याने निवड करावी.

७. जिल्ह्यात व्यावसायिक शिक्षण सुविधेमध्ये वाढ करून सवंयरोजगाराचे प्रशिक्षण आदिवासी मुलांना दिले जावे.

# संदर्भग्रंथसूची


**अ) इंग्रजी ग्रंथ**

1) Banerjee M. (1954) - *"Primitive Men in India,"* India Publication, Ambala.
2) Bogards, *"The religion of Primitive Tribes,"* Asia Publishing House, New Delhi, 1934.
3) Deogaonkar S. G. (1982) - *"The Madia of Bhamragad"* Inter-India Publication, New Delhi.
4) Deogaonkar S. G. (2007) - *"The Gonds of Vidarbha"* Castes and Tribes of India Series No. 10, Concept Publication Company, New Delhi-110059.
5) Dr. Tribhuwan Robin D. (2004) - *"Health of Primitive Tribes"* Discovery Publication House, New Delhi-110002.

**ब) हिन्दी ग्रंथ**

१) टेटे वंदना (२०१३) - "आदिवासी साहित्य परंपरा और प्रयोजन" प्यारा केरकेट्टा फाउण्डेशन, राँची-८३४००९.

२) गुप्ता रमणिका (संपादक) (२०१५) - "आदिवासी विकास से विस्थापन" राधाकृष्ण प्रकाशन, नई दिल्ली -११०००२

३) पंकज अश्विनी कुमार (संपादक) (२०१७) - "प्राथमिक आदिवासी विमर्श" प्यारा केरकेट्टा फाउण्डेशन, राँची-८३४००९

४) मीना जनक सिंह, मीना कुलदीप सिंह (संपादक) (२०१७) - "भारत के आदिवासी : चुनौतियाँ एवं सम्भावनाएँ," वाणी प्रकाशन, नयी दिल्ली - ११०००२.

५) सिकलीकर पी. सी. (१९९४) - "वन एवम् आदिवासी सामाजिक जीवन,"' शिवा पब्लिशर्स, जसपूर.

## क) मराठी ग्रंथ


१) आकरे बी. एन. (२००९) - "आदिवासींच्या जीवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम" पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्यटुर्स, नागपूर.

२) आकरे बी. एन. (२०१४) - "आदिवासींची आळेख" पिंपळापरु बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपरू

३) आमटे प्रकाश (२००९) - "प्रकाशवाटा" समकालीन पक्राशन, पुणे

४) आगलावे प्रदिप (२०१०)-"आदिवासी समाजाचे समाजशास्त्र" श्री साईनाथ पक्र ाशन,नागपरू

५) आफळे मरुलीधर, प्रभुणे अरुण (२०१२) - "आदिवासी संस्कृतीः कला व कथा (भाग पहिला)" केदार पक्र ाशान, आरैं गाबाद.

६) कऱ्हाडे बि. एम. (२०१०) - "आदिवासी समाजाचे समाजशास्त्र" पिंपळापूरे अॅण्ड कं. पब्लिशर्स नागपरू

७) कुलककर्णी शौनक (२००९) - "महाराष्ट्रातील आदिवासी" डायमंड पब्लिकेशन, पुणे.

८) कोडीतकर सरेश (२००८) - "आदिवासी जिवन कथा आणि व्यथा" सुगावा प्रकाशन, पुणे.

९) गारे गोर्विंद (२०००) - "महाराष्ट्रातील आदिवासी जमाती" कॅन्टिनन्टेल पकाशन, पुणे.

१०) घाटे निरंजन (२००९) - "आदिवासींचे अनोखे विश्व" मनोविकाश प्रकाशन, पुणे

११) तेगमपुरे मारोती (२००९)-"आदिवासी विकास आणी वास्तव" चिन्मय प्रक ाशन, औरंगाबाद.

१२) देशमुख सुदर्शन (२००७) - "आदिवासी समाजाचे दारिद्र" निर्मल प्रकाशन, नांदेड.

१३) देवगांवकर एस. जी. (२०११) - "आदिवासी विकास प्रशासन" श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

१४) सरकुंडे माधव (२०११) - "आदिवासी अस्मितेचा शोध" देवयानी प्रकाशन, यवतमाळ


## ड) अप्रकाशित शोधप्रबंध


१) कोकाटे चंद्रकांत नामदेवराव (२००८) - "हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाजाचे आर्थिक व सामाकि अध्ययन" डॉ. बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, येथे सादर केलेला शोधप्रबध.

२) शेकोबा परशुराम ढोले (२०१७) : 'आदिवासी विकास योजनांचे मूल्यमापन : एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)' स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा, विद्यापीठ नांदेड, येथे पीएच. डी. पदविसाठी सादर केलेला शोध प्रबंध

**इ) मासिके, नियतकालीके , शासकीय अहवाल व पक्राशने, दै. बातमी पत्र**

१) *Census of India २०११* - Demographic status of Scheduled Tribe population and its distribution, Table १.८

२) 'अर्थसंवाद' पगार एस. के. - 'आदिवासी विकासात केंद्रवर्ती अथसंकल्पाची भूमिका' मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक,ऑक्टोबर - डिसबें र २०११ / खडं ३५, अंक ३

३) 'आदिवासी सशोंधन पत्रिका' - आदिवासी संशाधेन व प्रशिक्षण संस्था, पुणे, Vol.XXXVI No.१, मार्च २०१२.

४) 'कार्यक्रम अंदाजपत्रक २०२२-२३' - आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य

५) 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन- २०२२, जिल्हा हिंगोली' - अर्थ व सांख्याकि संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुबई

६) 'योजना' (जानवारी २०१४) - विकास सर्मपित मासिक, नियोजन आयोग, माहिती व प्रसारण मंत्रालय, नवी मुंबई.

७) 'लोकराज्य' (आॅगष्ट २०१३) - माहिती व जनसपंर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मबुंई

**ई) विविध संकेतस्थळे**

१) https://tribal.nic.in/

२) www.mahades.maharashtra.gov.in

३) https://trti.maharashtra.gov.in/

४) https://hingoli.nic.in/mr/

*स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत*

*लघू शोध प्रकल्प*

**'आदिवासी समाजाच्या सक्षमिकरणाच्या शासकीय योजनांचा अर्थशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ कळमनूरी तालुका'**

**मुलाखत अनुसूची**

**संशोधक**
**डॉ. अण्णाजी दयाराम मडावी**
सहा. प्राध्यापक व
अर्थशास्त्र विभाग प्रमूख
आदर्श महाविद्यालय, हिंगोली

--------------------------------------------------------------------------------

**(सुचना :-** *१) या मुलाखत अनुसूचीतील माहितीचा उपयोग फक्त संशोधन कार्यासाठीच केला जाईल २) या मुलाखत अनुसूचीतील माहिती गुप्त ठेवल्या जाईल.)*

--------------------------------------------------------------------------------

**१) सर्व साधारण माहिती :**

१) कुटुंबप्रमुखाचे नाव : --------------------------------------------------------------------------------

२) गांव : ----------------------- तालुका : कळमनूरी जिल्हा : हिंगोली

३) वय :------------------------- शिक्षण : -------------------- लिंग : पुरूष / स्त्रि

४) कुटुंबातील व्यक्तींची संख्या : पुरुष : -------- स्त्रिया : ------- एकुण : ------

५) व्यवसाय : -------------------------

**२) शेती व उत्पन्नाबाबत माहिती :**

१) स्वत:च्या मालकीची शेत जमीन आहे काय ? होय / नाही

२) असल्यास किती ? ------------- एकर / हेक्टर

३) यापैकी ओलीताखालील क्षेत्र किती ? ------------- एकर /हेक्टर

४) सिंचनाचे स्वरूप कोणते ? बारमाही / हंगामी

५) सिंचनाचे साधन कोणते आहे ?

१) विहीर २) तलाव ३) कुपनलीका ४) प्रकल्प/कॅनल

६) शेतीमध्ये आधुनिक साधनांचा वापर करता काय ? होय / नाही

७) करीत असल्यास कोणती साधने ?

१) ट्रॅक्टर २) नांगरणी यंत्र ३) कापणी यंत्र ४) मळणी यंत्र

५) इतर:------------------

८) शेतात कोणती पिके घेतात ?

१) तांदूळ २) गहू ३) तूर ४) हरभरा

५) इतर : १)------ २)------

९) इतर व्यवसाय करता काय ? होय / नाही

१०) करीत असल्यास कोणते व्यवसाय ?

१) दुग्धव्यवसाय २) शेळीपालन ३) कुक्कुटपालन ४) वराहपालन

५) इतर-----------------

११) इतर व्यवसायातून मिळणारे अंदाजे वार्षिक उत्पन्न किती ? रूपये ------------

१२) वनवस्तु गोळा करता काय ? होय / नाही

१३) करीत असल्यास कोणत्या वस्तु ?

१) डिंक संकलन २) तेंदू पत्ता संकलन ३) मोहफुल संकलन

४) इतर --------

१४) कुटुंबाच्या उत्पन्नात स्त्रियांचा हातभार लागतो काय ? होय / नाही

१५) असल्यास कोणत्या मार्गाने ?

१) शेतीकाम २) रोजगार हमी योजनेची काम ३) वनवस्तू संकन

४) इतर --------------

१६) स्त्रियांनी मिळविलेले अंदाजे वार्षिक उत्पन्न किती ? रुपये -----------------

**३) स्वयंरोजगाराबाबत माहिती :**

१) कुटुंबातील कोणाचा स्वयंरोजगार आहे काय ? होय / नाही

२) असल्यास कोणत्या प्रकारचा आहे ?

अ) दुग्धव्यवसाय ब) विटभट्टी क) वाहन चालवणे

ड) इतर ----------------

३) स्वयंरोजगारासाठी कोणत्या योजने अंतर्गत अर्थसहाय मिळाले ?

अ) समाजकल्याण विभाग ब) आदिवासी विकास विभाग

क) जिल्हा उद्योग केंद्र ड) इतर -----------

४) स्वयंरोजगारामुळे मिळणारे वार्षिक उत्पन्न किती ? रुपये --------------

५) स्वयंरोजगारामध्ये काही अडचणी आहेत काय ? होय / नाही

६) असल्यास कोणत्या ?

अ) भांडवल कमतरता ब) अपुरे उत्पन्न क) स्पर्धा

ड) वाहतुकीचे साधन इ) इतर -------

**४) आर्थिक स्थितीबाबत माहिती :**

१) आपल्या कुटुंबाचे नाव दारिद्रय रेषेखालील यादीत आहे काय ? होय / नाही

२) असल्यास दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ घेतला काय ? होय / नाही

३) लाभ घेतला असल्यास कोणत्या योजना ?

१) निवारा (घरकुल) योजना २) आरोग्याशी संबंधीत योजना

३) सार्वजनिक वितरण प्रणाली ४) इतर --------------

४) कुटुंबाचा वार्षिक उत्पन्न गट कोणता ?

१) ० ते १०,००० २) १०,००१ ते २५,००० ३) २५,००१ ते ५०,०००

४) ५०,००१ ते ७५,००० ५) ७५,००१ ते १००,००० ६) १०००० पेक्षा जास्त

५) मिळणाऱ्या उत्पन्नातून कुटुंबाच्या गरजा पुर्ण होतात काय ? होय / नाही

६) गरजा पुर्ण होत नसल्यास त्याची कारणे कोणती ?

१) उत्पन्नाचे प्रमाण कमी २) कुटुंबाचा आकार मोठा ३) आजारपण

४) सामाजिक व धार्मिक प्रथा ५) इतर -------------

७) कर्ज घेतले आहे काय ? होय / नाही

८) घेतले असल्यास कोठून ?

१) बचत गट २) सावकर ३) नातेवाईक ४) बँक

५) इतर------------

९) कर्ज घेण्याचे कारण कोणते ?

१) उदर निर्वाहासाठी २) मुलांचे शिक्षण ३) विवाह समारंभ

४) धार्मिक व सामाजिक कार्य ५) इतर-----------------

१०) कुटुंबाचा मासिक उपभोग खर्च किती ?

१) ० ते ५०० रू. २) ५०१ ते १,००० रू. ३) १,००१ ते २,५०० रू.

४) २,५०१ ते ५००० रू. ५) ५,००१ रू. पेक्षा जास्त

११) व्यसनाची सवय आहे काय? होय / नाही

१२) असल्यास कोणते

१) मद्यपान २) मद्यपान व तंबाखू ३) तंबाखू

४) इतर --------------

**५) शासकीय योजना बाबत माहिती :**

१) शासकीय योजना विषयी माहिती आहे काय ? होय / नाही

२) आजपर्यंत शासकीय योजनांचा लाभ घेतला आहे काय ? होय / नाही

३) घेतला असल्यास कोणत्या योजनेचा ?

**अ) समाजकल्याण विभागाच्या योजना-**

१) इंदिरा आवास योजना  २) दसलक्ष विहीर योजना

३) पशुसंवर्धन योजना ४) विजपंप/तेलपंप वाटप योजना ५) इतर ---------

**ब) आदिवासी विकास विभागाच्या योजना-**

१) शिलाई मशीर वाटप  २) मंडप संचाचे वाटप  ३) मळणीयंत्राचे वाटप

४) पि.व्ही.सी. पाईपचे वाटप  ५) विजपंप/तेलपंप वाटप ६) इतर ---------

४) शासकीय योजनांची माहिती कोणाकडून मिळाली ?

१) वर्तमान पत्र  २) दुरचित्रवाणी संच  ३) रेडीओ

४) ई-चौपाल  ५) इतर -----------------

५) योजनांची माहिती मिळवतांना तुमच्याकडून दलाली घेतली काय ? होय / नाही

६) दलाली दिली असल्यास कोणत्या स्वरूपात ?  वस्तू / पैसा

७) शासकीय योजनांच्या लाभामुळे आर्थिक स्थितीत सुधारणा झाली काय ?

होय / नाही

८) सुधारणा झाली नसल्यास कारणे कोणती ?

१) मध्यस्थावरील अधिक खर्च  २) गरजेच्या मानाने अपुरी साधने

३) निकृष्ट दर्जाचे साहित्य  ४) इतर ---------------

९) शासकीय योजनांची कोणत्या स्वरूपात मदत झाली ?

१) उदरनिर्वाह  २) स्वयंरोजगार  ३) जीवनमानात सुधारणा

४) इतर -----------------

१०) शासकीय योजनांच्या लाभामुळे शैक्षणिक दर्जा सुधारला काय ?  होय / नाही

११) शासकीय योजनांच्या लाभामुळे आरोग्य विषयक दर्जा सुधारला काय ?

होय / नाही

१२) शासकीय योजनांचा लाभ मिळाला नसल्यास त्याची कारणे कोणती ?

१) माहिती उपलब्ध नसने २) योजनेची किचकट प्रक्रिया

३) कागदपत्रासाठी येणारा खर्च ४) कार्यालयाचे अंतर

५) कार्यालयीन कर्मचाऱ्यांची वागणुक ६) इतर ---------------

१३) आदिवासी समाजाच्या सर्वांगीन प्रगतीसाठी सरकारची भुमिका महत्वाची आहे काय? होय / नाही

१४) आदिवासी समाजासाठी असणाऱ्या योजनेच्या यशस्वीतेसाठी सरकारने काय करावे असे आपणास वाटते ?

--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------
---------

ठिकाण : -----------------------
उत्तरदात्याची सही /अंगठा

दिनांक : / / नांव : ------------------
------------------------------------------